महिला सदस्येला बाबांनी सीतानाथाच्या रूपात दर्शन दिले, तर तिच्या पतीला श्री रामदास स्वामींच्या. काका महाजनी यांच्या निराकारवादी व मूर्ति-पूजाविरोधी मित्राला बाबांचा आवाज बिल्कुल आपल्या कैलासवासी पित्याच्या आवाजानुसार वाटला आणि त्यांना आपल्या वडिलांची आठवण झाली.

श्री साईबाबांची द्वारकामाई सर्व धर्मातील लोकांसाठी, एवढेच नव्हे, तर भयंकर रोगाने पीडित भागोजी शिंदेसारख्यांनाही मुक्त होती. ही द्वारकामाई बाबा शिरडीत येण्यापूर्वी जीर्ण-शीर्ण मशिद होती. बाबांनी तिला द्वारकामाईचं रूप दिलं; आणि चारी वर्णांसाठी ती खुली केली.

श्री साईबाबांचे पंचमहाभूतांवर नियंत्रण होते; परंतु त्यांनी त्याचा उपयोग स्वतःच्या भल्यासाठी कधीही केला नाही. भिकाऱ्याला राजा बनविण्याची क्षमता त्यांच्या कृपेत होती; परंतु असे असूनही ते स्वतः फाटके-तुटके कपडे घालीत असत, भिक्षावृत्तीने जीवन व्यतीत करीत असत. इंद्रियसुखांची त्यांना बिल्कुल आसक्ती नव्हती. दक्षिणेच्या रूपात भक्त जे काही अर्पण करीत असत त्यातील थोडीशी दक्षिणा ते चिलमीची तंबाखू व धूनीसाठी लागणाऱ्या लाकडांवर खर्च करीत असत आणि उरलेली सर्व दक्षिणा भक्तांमध्ये वाटून दुसऱ्याच दिवशी ते निर्धन होत असत. प्रसाद म्हणून आलेली केळी सोलून ती ते भक्तांना देत असत व त्यांच्या साली स्वतःसाठी ठेवीत असत. त्यांनी नित्य अलम दुनियेच्या उद्धाराचाच विचार केला. अंतिम क्षणीही त्यांनी तात्या पाटील यांचा मृत्यू स्वतःवर ओढवून याचा परिचय करविला. ऐहिकदृष्ट्या ते शिरडीत जरी दिसत असले, तरी भक्तांच्या संकटकाळी, त्यांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी अटकेपारही धाव घेत असत.

'संन्यासी' हा शब्द समोर येताच आपल्यासमोर उभी राहते प्रतिमा, घरदार सोडून जंगलात एकांतवासात ध्यानधारणा करणारी व्यक्ती. बाबा मात्र अशा साधुसंतांप्रमाणे नव्हते. त्यांना स्वतःचा संसार नव्हता; परंतु संसारातच राहून त्यांनी दुसऱ्यांचे संसार चालविले.

याचा प्रत्यक्ष अनुभव खानदेश जिल्ह्यातील जामनेरचे नानासाहेब चांदोरकर यांनी सन १९०४-०५ मध्ये घेतला. शिरडीपासून जामनेर जवळजवळ १०० मैल दूर आहे. तेथे नानासाहेबांची कन्या मैनावती गरोदर होती आणि भयंकर अत्यवस्थ होती. सर्व भौतिक प्रयत्नांनी हात टेकल्यावर नानासाहेब बाबांना शरण गेले आणि त्यांनी त्यांची त्यांच्या कृपाळू आशीर्वादासाठी प्रार्थना केली. त्याचवेळी शिरडीत खानदेशला परतण्याच्या तयारीत असलेल्या रामगीरबुवांना बाबांनी त्वरित बोलावून घेतले आणि उदी व आरतीची एक प्रत त्याच्या हातात देत म्हणाले,

**"ही उदी आणि ही आरतीची प्रत नानासाहेबांच्या येथे उतरून त्यांना दे!"**

रामगीरबुवांनी जेव्हा त्यांच्याकडे तेवढे पैसे नसल्याचे सांगून नानासाहेबांकडे जाण्यास आपली असमर्थता व्यक्त केली तेव्हा बाबा त्यांना म्हणाले,

**"चिंता करू नकोस! सर्वकाही ठीक होईल!"**

बाबांच्या या अमूल्य आश्वासनाबरहुकूम सर्वकाही ठीकच झाले. रामगीरबुवा जेव्हा जळगावी पोहोचले, तेव्हा रात्रीचे पावणे तीन वाजले होते आणि त्यांच्या खिशात तर अवघे दोन आणे शिल्लक राहिले होते. अशा परिस्थितीत पुढचा पल्ला कसा गाठायचा, या विवंचनेत रामगीरबुवा असतानाच एक शिपाई नानासाहेबांकडे जायचे आहे काय, विचारीत त्यांच्यासमोर आला. रामगीरबुवांना वाटलं, कदाचित नानासाहेबांनी आपण येणार असल्याचं कळल्याने शिपायाला टांगा घेऊन पाठविलं असेल. परंतु नानासाहेबांकडे गेल्यावर आपण ज्या टांग्यानं आलो व ज्या शिपायाने आपल्याला सोबत केली, ते दोन्ही आजूबाजूला नंतर कुठे दिसत नसल्याचे पाहून रामगीरबुवांनी नानासाहेबांकडे तशी विचारणा केली. रामगीरबुवांची शिरडीपासून जामनेरपर्यंतची सर्व हकिगत ऐकून नानासाहेब तर कोड्यातच पडले; कारण त्यांना रामगीरबुवा शिरडीहून त्यांच्याकडे येत असल्याची पूर्वसूचना मिळालीच नव्हती. बाबांची ही अद्भुत लीला पाहून उपस्थित सर्वांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले.

श्री साईबाबा सारखे म्हणत,

**"माझा भक्त हजारों मैल दूर का असेना, तो शिरडीला असा काही ओढून येतो, जसा धाग्याला बांधलेलं पाखरू स्वतःच येतं."**

बाबांच्या या मौलिक वचनाचा अनुभव मुंबईचे लाला लक्ष्मीचंद, रामलाल पंजाबी, नाशिकच्या श्री सप्तश्रृंगी देवीचे मुख्य पुजारी काकाजी वैद्य, बुऱ्हानपूरची एक महिला इत्यादी अनेकांनी घेतला. आजही, बाबांच्या समाधीला पंच्याहत्तर वर्षे पूर्ण होत असताना, असंख्य लोक याचा अनुभव घेत आहेत. बाबांनी म्हटलंच होतं,

"शिरडीत मुंग्यांसारख्या रांगा लागतील!" बाबांच्या या उद्गाराचा प्रत्यय आजही येत आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून, परदेशांतून बाबांच्या दर्शनासाठी झुंडीच्या झुंडीने लोक शिरडीला येत आहेत, समाधीमंदिरासमोर मोठमोठ्या रांगा लागत आहेत.

---

**समाधि आणि निंबसमेत। चौफेर जागा घेऊनि विकत। साठे साहेब बाबांचे भक्त। चौसोपी इमारत उठविती।। हीच इमारत हाच वाडा। यात्रेकरूंचा मूळ आखाडा। आलिया गेलियाचा राडा। एकचि गाढा तें स्थानीं।। पुढें झाला दीक्षितांचा वाडा। सोय झाली प्रशस्त बिऱ्हाडां। अल्पकालांत तेथेंचि पुढां। दगडी वाडाही ऊठला।। पुढें श्रीमंत बुट्टींचा इमला। अलोट पैका खर्ची घातला। देहही बाबांचा तेथ विसवला। पैका लागला सार्थकीं।। वाडे झाले तीन आतां। जेथें पूर्वीं एकही नव्हता। आरंभीं साठ्यांचे वाड्याची उपयुक्तता। फारचि समस्तां जाहली।। आणिक एक या वाड्याची महती। आरंभीं याच स्थानावरती। फुलझाडांची बाग होती। निर्मिली निजहस्तीं बाबांनीं।।**

---

'जीवा'च्या कल्याणार्थ बाबांचे सेवाभावी कार्य पुढे चालविण्यासाठी सन १९२२ मध्ये **'श्री साईबाबा संस्थान, शिरडी'** या धर्मादाय संस्थेची स्थापना करण्यात आली. १९२२ ते ऑगस्ट १९८९ पर्यंत संस्थानचा कारभार सांभाळणाऱ्यांनी आपापल्या कुवतीप्रमाणे

भक्तांना शिरडीत सुख-सोयी उपलब्ध करून दिल्या. सप्टेंबर, १९८९ मध्ये विद्यमान विश्वस्त मंडळाने संस्थानच्या कारभाराची धुरा सांभाळली. संस्थानचा कारभार हाती घेताच विश्वस्त मंडळाने भक्तांना सतावणारा निवासाचा ज्वलंत प्रश्न सोडविण्याला प्राधान्य दिले; आणि दिनांक ४ मे, १९९० रोजी महाराष्ट्राचे अर्थ व नियोजन मंत्री श्री. रामराव आदिक यांच्या हस्ते 'साईबाबा भक्त निवास' या इमारतीचा भूमीपूजन समारंभ पार पडला. ही भव्य-दिव्य इमारत पूर्णत्वाने साकार व्हायला सव्वातीन वर्षे लागली; आणि सोमवार, दिनांक १६ ऑगस्ट, १९९३ रोजी भारताचे पंतप्रधान श्री. नरसिंह राव यांच्या हस्ते या इमारतीचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या इमारतीत ५६० खोल्या असून ३५०० भाविक सामावू शकतील एवढे दोन मोठे सभागृह आहेत. प्रत्येक खोलीत निवासाला आवश्यक असलेल्या संपूर्ण स्वतंत्र सोयी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. श्री साईबाबांच्या अमृत महोत्सवी पुण्यतिथीच्या शुभमुहूर्तावर या इमारतीत भक्तांच्या निवासाला प्रारंभ होणार आहे. ८० खोल्यांच्या **'प्रसादालय'** या निवासी इमारतीचे काम काही अडचणींमुळे खोळंबून होते ते विद्यमान विश्वस्त मंडळाने मार्गी लावले व ही इमारत भक्तांना उपलब्ध करून दिली.

बाबांच्या कार्यमहात्म्यामुळे शिरडीत येणाऱ्या भाविकांत दिवसागणिक वाढ होत आहे. समाधीमंदिराचा आजूबाजूचा परिसर अगदीच दाटीदाटीचा असल्याने गर्दीच्या वेळी भाविकांना खूप त्रास सहन करावा लागतो. काही वेळा तर चेंगराचेंगरी व्हायचा प्रसंग उद्भवतो. यासाठी भक्तांना विनासायास, शांत व प्रसन्न वातावरणात श्री साईबाबांच्या दर्शनाचा लाभ सहज व मनसोक्त व्हावा म्हणून विधमान विश्वस्त मंडळाने **मंदिरपरिसराच्या विस्तारीकरणाची योजना** आखली. तिचा भूमीपूजन समारंभ भारताचे राष्ट्रपती श्री. शंकरदयाळ शर्मा यांच्या शुभहस्ते शनिवार, दिनांक ३१ जुलै, १९९३ रोजी पार पडला. विस्तारीकरणाच्या योजनेत भक्तांना स्थिरवृत्तीने 'ध्यानधारणा' करता यावी यासाठी सभागृह, उपवन, भूमिगत प्रतीक्षागृह आदींचे निर्माण केले जाणार आहे, ज्यामुळे भक्तांना श्री साईबाबांचे दर्शन सहज-सुलभ होईल व त्यांना मन:शांती लाभेल.

---

**श्री साईबाबा मनुष्यदेहात शिरडीत कार्यरत असताना त्यांनी शिरडीतील बहुतेक सर्व मंदिरांचा जीर्णोद्धार केला. त्यांचे एक भक्त श्री. तात्या पाटील यांच्याकडून शनि, गणपति, शंकर, पार्वती, हनुमान आणि ग्रामदेवता आदी देवतांच्या मंदिरांची डागडुजी करून घेतली. त्याचप्रमाणे श्री साईबाबांच्या अनुमतीनेच नानासाहेब चांदोरकर व काकासाहेब दीक्षित यांनी मशिदीच्या जीर्णोद्धाराचे कार्य पार पाडले.**

---

आरतीच्या वेळी समाधीमंदिरात उपस्थित रहायला मिळावे, अशी शिरडीत येणाऱ्या बहुतेक सर्व भाविकांची अनिवार इच्छा असते. परंतु सद्या २५०-३०० भक्तच समाधीमंदिरात सामावू शकत असल्याने इतरांची फार निराशा होते. ही समस्या दूर करण्यासाठी समाधीमंदिर, द्वारकामाई, गुरूस्थान, चावडी यांच्या मूळ बांधणीला धक्का न लावता मंदिरपरिसराचा केवळ विस्तार करण्यात येणार आहे. गर्दीच्या वेळी समाधीमंदिराबाहेर लांबच लांब रांगा लागतात. कडक उन्हात, **कडाक्याच्या** थंडीत व मुसळधार पावसात रांगेत उभ्या असलेल्या भक्तांना खूप त्रास सहन करावा लागतो. तो होऊ नये याकरिता मंदिरपरिसराच्या विस्तारीकरणात भूमिगत प्रतिक्षागृह बांधण्यात येणार आहे, ज्यात दोन-तीन हजार भक्त आरामात सामावू शकतील अशी व्यवस्था असेल. त्याचप्रमाणे धार्मिक समारंभाच्या आयोजनासाठी मंदिरपरिसरात जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मंदिरपरिसराचा विस्तार करताना मंदिराची अधिकाधिक शोभा वाढविण्यासाठी जे जे करणे आवश्यक आहे, ते केले जाणार आहे.

समाधीवर चढून दर्शन घेण्याची अनिष्ठ प्रथा विद्यमान विश्वस्त मंडळाने बंद केली, ज्यामुळे श्रद्धाळूंच्या भावना दुखावल्या जात होत्या.

सकाळच्या वेळी समाधीमंदिरातील गर्दीमुळे कित्येक भाविकांना मंदिरातील कार्यक्रमांपासून वंचित रहावे लागते. भाविकांची ही समस्या लक्षात घेऊन विद्यमान विश्वस्त मंडळाने मंदिरपरिसरात क्लोझ-सर्किट टी.व्ही.ची व्यवस्था केली आहे. रिमोट कंट्रोल कॅमेऱ्याद्वारे समाधीमंदिर, द्वारकामाई, गुरूस्थान, चावडी येथे चाललेले कार्यक्रम टी.व्ही. वर दाखविले जातात. व्ही.सी.आर. लावायची सोय असल्याने अन्य धार्मिक कार्यक्रमही टी.व्ही.वर दाखविले जातात.

श्री साईबाबांनी आपल्या अवतारकार्यात रूग्णांच्या सेवेला फार मोठे महत्त्व दिले होते. सुरूवातीला ते रोगाचं निदान करून रूग्णांना औषध देत असत. त्यांची चिकित्सा-पद्धत मोठी विचित्रच होती. एकदा एका भक्ताचे डोळे खूपच लाल झाले होते, डोळ्यांना सूजही आली होती, तेव्हा बाबांनी बिब्बा कुटून त्याच्या दोन गोळ्या बनविल्या आणि रोग्याच्या डोळ्यांत एक एक गोळी चिकटवून त्यावर पट्टी बांधली. दुसऱ्या दिवशी पट्टी काढून त्यावर पाण्याची धार सोडली. आणि काय आश्चर्य! डोळ्यांची सूज जाऊन ते चक्क पाणीदार झाले. अशी होती बाबांची उपचार पद्धती, सर्वथ: भिन्न.

बाबांच्या कृपेनेच कितीतरी लोक रोगापासून मुक्त झाले. दादासाहेब खापडर्यांचा ग्रंथीज्वराने पीडित मुलाचा प्लेग बाबांनी स्वत:वर घेतला. भीमाजी पाटील यांचा कफक्षय रोग बाबांनी हरण केला. बाळा गणपत शिंप्याला जुनाट हिंवतापापासून मुक्त केले. बाबांच्या कृपादृष्टीनेच बापूसाहेब बुट्टी यांच्या महामारी व आम्लपित्ताचा समूळ नायनाट झाला. आळंदीच्या स्वामींना कानांच्या वेदनेमुळे होणारी असह्य पीडा दूर झाली. काका महाजनींचा अतिसार दूर झाला. हरदाचे दत्तोपंत, काका महाजनींचे मोठे भाऊ गंगाधरपंत व नानासाहेब चांदोरकर यांचा


(पृष्ठ क्र. ३७ वर)



1




2



3



4



5

१. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन-कन्याशाळा


२. इंग्रजी माध्यमाची शाळा–शिरडी व १५ कि.मी. पर्यंतच्या विद्यार्थ्यांना लाभ

३. मनोजकुमार अतिदक्षता ह्रदयरोगनिदान विभाग

४. श्रीमती जानकीदेवी सुरी सोनोग्राफी केंद्र

५. राजू बात्रा क्ष-किरण कक्ष आदी आधुनिक उपचारांची 'श्री साईनाथ' रूग्णालयात सोय






साईभक्तांना व ग्रामस्थांना सुखसोयी उपलब्ध करून देण्याच्या विद्यमान विश्वस्त मंडळाच्या प्रयत्नांना राज्य सरकार सतत मदत करीत राहील, असे आश्वासन देत असताना मुख्यमंत्री श्री. शरद पवार व मंचावर डावीकडून प्रा. डॉ. लेखा पाठक, श्री. नरसिंह राव, श्री. रामराव आदिक, श्री. शिवाजीराव देशमुख, अखिल भारतीय काँग्रेस समितीचे मुख्य सचिव श्री. जनार्दन पुजारी

साईभक्तांच्या निवासासाठी सर्व सुविधांनी युक्त सुसज्ज इमारत 'साईबाबा भक्त निवास'






'साईबाबा भक्त निवास'च्या उद्घाटनप्रसंगी डावीकडून केंद्रीय ऊर्जामंत्री श्री. एन्. के. पी. साळवे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष श्री. शिवाजीराव देशमुख, मुख्यमंत्री श्री. शरद पवार, पंतप्रधान श्री. नरसिंह राव, संस्थानच्या अध्यक्षा प्रा. डॉ. लेखा पाठक, अर्थ, नियोजन, विधी व न्याय मंत्री श्री. रामराव आदिक








1



2



3



4



5

१. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उपयोगी शिक्षणक्रमांची भर

२. समाधीमंदिर, गुरूस्थान, द्वारकामाई व चावडीत चाललेले व अन्य धार्मिक कार्यक्रम संस्थानपरिसरात लावलेल्या दूरदर्शन संचांवर दाखविण्याची व्यवस्था

३. कामात अचुकता व शीघ्रता आणण्यासाठी संगणकीकरण

४. सर्व जाती–धर्माचे लोक 'प्रसादालयात' एकत्र बसून भोजन घेतात

५. 'प्रसादालयाचा' मुदपाकखाना प्रदूषणरहित आधुनिक संयंत्रांनी परिपूर्ण

(पृष्ठ क्र. ३२ वरून)

पोटशूळ संपुष्टात आला. माधवराव देशपांडे यांचा मूळव्याध बरा झाला. अमीर शक्कर यांना संधिवातापासून मुक्ती मिळाली. शामा सर्पदंशापासून मुक्त होऊन त्यांची प्रकृती पूर्ण स्वस्थ झाली. शिरडीत पसरलेला महामारीचा प्रकोप सीमापार झाला. हरिश्चंद्र पितळे यांच्या पुत्राचा अपस्मार रोग समूळ नष्ट झाला. मालेगावच्या एका डॉक्टरांच्या पुतण्याचा असाध्य रोग दूर झाला. डॉक्टर पिल्ले यांची नारू रोगापासून सुटका झाली.

श्री साईबाबांच्या हाताला अपरिमित यश होते. यामुळे त्यांच्याकडे येणाऱ्या रोग्यांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली. म्हणून त्यांनी आपल्याजवळ दुःख निवारण्यासाठी येणाऱ्या लोकांना उदी द्यायला सुरूवात केली.

श्री साईबाबा संस्थान, शिरडी ने 'श्री साईनाथ' रूग्णालयाच्या रूपाने श्री साईबाबांचे हे रोग-निवारण्याचे सेवाभावी कार्य पुढे चालविले आहे. या रूग्णालयात अधिकाधिक सोयी उपलब्ध करून देण्याचे शिकस्तीचे प्रयत्न विद्यमान विश्वस्त मंडळाने चालविले आहेत.

रूग्णालयात उपचारार्थ येणाऱ्या रूग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन रूग्णालयातील डॉक्टरांची संख्या वाढविण्यात आली आहे व प्रत्येक विभागात तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या रूग्णालयात 'मनोजकुमार अतिदक्षता हृदयरोगनिदान विभाग', 'श्रीमती जानकीदेवी सुरी सोनोग्राफी केंद्र', 'राजू बात्रा क्ष-किरण कक्ष' इत्यादी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून अहमदनगर, औरंगाबाद, नासिक इत्यादी जिल्ह्यांतील रूग्णांना व शिरडीत येणाऱ्या भाविकांना याचा लाभ होत आहे. या रूग्णालयाच्या वतीने वेळोवेळी नेत्रचिकित्सा, मोतिबिंदू शस्त्रक्रिया, बालकांचे शरीरस्वास्थ्य, कुटुंब-नियोजन, कर्करोग, आयुर्वेदिक इत्यादी वैद्यकीय शिबिरं आयोजित करण्यात येतात. या **रूग्णालयाच्या विस्तारीकरणाची योजना** आखण्यात आली असून तिचे प्रत्यक्ष काम नजिकच्या काळात सुरू करण्यात येणार आहे. रूग्णालयाच्या विस्तारीकरणानंतर वैद्यकीय संशोधन केंद्र, वैद्यकीय व परिचारिका महाविद्यालयाचे काम हाती घेण्यात येणार आहे. आर्थिक स्थिती बिकट असलेल्या अन्य रूग्णालयात दाखल गरजू रूग्णांना संस्थानद्वारा आर्थिक मदत दिली जाते. विशेष म्हणजे, संस्थानच्या अध्यक्षा प्रा. डॉ. लेखा पाठक या ख्यातनाम हृदयरोगतज्ञ असल्याने 'श्री साईनाथ' रूग्णालयाला याचा खूपच फायदा होत आहे.

---

**युगायुगाचें सिद्ध साधन। मानवधर्मशास्त्रीं वचन। कृतीं तप, त्रेतीं ज्ञान। द्वापरीं यज्ञ, दान कलीं॥ सदा सर्वदा दानधर्म। क्षुधाशांती परम वर्म। अन्नदान नित्यनेम। कर्मांत कर्म हें आद्य॥ होतां दोनप्रहरचे बारा। अन्नावीण जीव घाबरा। जैसें आपणा तैसेंच इतरां। जाणील अंतरा तोचि भला॥ आचारधर्मामाजीं प्रधान। अग्रगण्य अन्नदान। पाहूं जातां तयाहून। कांहीं न आन श्रेष्ठत्वें॥ परब्रह्मस्वरूप अन्न। त्यांतूनि भूतें होती निष्पन्न। अन्नचि जीवें जगाया साधन। अन्नांतर्लीन अवसानीं॥ वेळीं अवेळीं येतां अतिथि। अन्नदानें सुखवावा गृहस्थीं। अन्नावीण जे माघारा लाविती। अचूक दुर्गती आमंत्रिती॥ वस्त्रपात्रादिदानीं विचार। अन्नदानीं नलगे आधार। कोणी कधींही येवो दारावर। बरवा न अनादर तयाचा॥ ऐसी अन्नदानाची महती। एतदर्थ प्रमाण श्रुती। म्हणूनि बाबाही अन्न संतर्पिती। लौकिकरीती आचरिती॥ मग तें शेष सकळ अन्न। बाबा वाढीत निजहस्तेंकरून। गरीब दुबळे तृप्त करून। सुख समाधान पावत॥ ते अन्नार्थी यावत्तृप्ति। अन्न सेविती उल्लासवृत्ती। वरी बाबा आग्रह करिती। घ्या घ्या म्हणती प्रीतीनें॥**

---

श्री साईबाबांनी आपल्या अवतारकार्यात अन्नदान व सामूहिक भोजनाला विशेष महत्त्व दिले होते. बाबांची हुंडी तर सर्वविदित आहे. 'प्रसादालय'च्या रूपाने संस्थानने बाबांच्या या महान कार्याचे अनुकरण केले आहे. येथे भक्तांच्या दुपारच्या व रात्रीच्या भोजनाची व्यवस्था केली जाते. येथे एकाच वेळी १००० ची पंगत बसू शकते. भाविकांच्या संख्येत होणारी वाढ व लाकूड, डिझेल, भट्टी, स्टोव्ह आदींच्या परंपरागत वापरामुळे होणारे प्रदूषण लक्षात घेऊन विद्यमान विश्वस्त मंडळाने 'प्रसादालया'चे स्वयंपाकगृह आधुनिक संयंत्रांनी परिपूर्ण केलं आहे.

शिरडीहून परतताना भाविकांची इच्छा असते की प्रसाद म्हणून काहीतरी सोबत न्यावे. त्यावेळी ते जायच्या घाईतही असतात. भाविकांची ही इच्छा व निकड लक्षात घेऊन विश्वस्त मंडळाने सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत 'फूड-पॅकेटस्'ची व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. कोणत्याही वेळी भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून दिवस-रात्र कार्यरत असणारे उपहारगृहही येथे आहे. येथे चहा, कॉफी, अल्पोपहार आदी पदार्थ उपलब्ध असतात.

प्रसादालयाला लागणारे धान्य, भाजीपाल्यासारखे सामान आणण्यासाठी डी.सी.एम्. टोयाटो हे वाहन खरेदी करण्यात आले आहे. कामाचा वेग वाढविण्याची आवश्यकता लक्षात घेऊन भांडी धुण्याचे एक यंत्रही 'प्रसादालया'च्या सेवेत रूजू करण्यात आले आहे. अशाप्रकारे भाविकांना उत्तम व जलद सेवा उपलब्ध करून देण्याचा विश्वस्त मंडळ आटोकाट प्रयत्न करीत आहे. श्री साईबाबांना कधी काही वाचताना किंवा लिहिताना कोणी पाहिले नाही; परंतु त्यांचा एक एक शब्द वेद, बायबल, कुराणासारख्या धर्मग्रंथांप्रमाणे असे. त्यांनी त्यांच्याकडे येणाऱ्या भक्तांना विविध ग्रंथांचे वाचन करण्यास सांगितले, ज्ञान ग्रथित करायला प्रोत्साहन दिले.

बाबांनी श्री. हरि विनायक साठे यांना गुरूचरित्राचा एक सप्ताह आणि पारायण करायला सांगितले. बाबांच्या आज्ञेनेच बापूसाहेब जोग, काकासाहेब दीक्षित शिरडीत नित्यनियमाने ज्ञानेश्वरी, नाथ भागवत व भावार्थ रामायणाचं वाचन करीत असत. हेमाडपंतांचा नेमाने चालणारा 'नाथ भागवता'चा पाठ जेव्हा एकदा अपूर्ण राहिला तेव्हा बाबांनी हेमाडपंतांना शामाकडे पाठवून

तो अर्धा राहिलेला पाठ पूर्ण करविला. दासगणू महाराजांना ईशोपनिषदातील एका ओळीची उकल होत नव्हती तेव्हा बाबांनी काकासाहेब दीक्षितांच्या मोलकरणीकडून त्यांच्या प्रश्नाचे समाधान केले. बाबांनी शामाला काका महाजनींनी आणलेले एकनाथी भागवत व रामदासीकडील विष्णुसहस्त्रनामाची छोटी पुस्तिका देवून ती कंठस्थ करायला सांगितले.

काका महाजनींनी आणलेली एकनाथी भागवताची दुसरी प्रत बाबांनी त्यांना प्रसादाच्या रूपात परत करून ती सांभाळून ठेवण्याची आज्ञा केली. बापूसाहेब जोगांनी आणलेल्या श्री. लोकमान्य टिळकांच्या गीता-भाष्याच्या एका प्रतीवर बाबांनी खिशातून काढलेला रुपया ठेवला व ती प्रत जोगांना परत करीत ते म्हणाले,

**''याचं ध्यान लावून अध्ययन करा ! याने तुमचे कल्याण होणार आहे !''**

एक मद्रासी संन्यासी विजयानंद याला इच्छा-रहित करण्यासाठी बाबांनी त्याला भागवताचे तीन आठवडे पाठ-पठन करायला सांगितले व त्याचा अंत:काळ जवळ आलेला पाहून त्याला 'रामविजय' वाचायची आज्ञा केली. बाबांच्याच कृपेने श्री. बी. व्ही. वझे यांना ज्ञानेश्वरीचे दरदिवशी वाचन करणे शक्य झाले.

मी कोण आहे ? हे जाणून घ्यायला जे उत्सुक होते, त्यांना बाबांनी भगवत्लीलेचे श्रवण व मनन करायचा मार्ग दाखविला. कुणाला भगवत्पादपूजन, तर कुणाला अध्यात्म रामायण, ज्ञानेश्वरी आदी धार्मिक ग्रंथांचे वाचन व अध्ययन करायला सांगितले. अनेकांना त्यांनी आपल्या चरणांपाशी ठेवले, कित्येकांना खंडोबाच्या मंदिराकडे पाठविले, तर कितीतरी जणांना विष्णुसहस्त्रनामाचा जप व छांदोग्य उपनिषद, गीता यासारख्या ग्रंथांचा अभ्यास करण्यास सांगितले. त्यांच्या उपदेशांना कोणतीही सीमा नव्हती. बाबांची शिकवण देण्याची पद्धत अपूर्व व अद्वितीय होती. ब्रह्मविद्येचे (अध्यात्म) जो अध्ययन करीत असे, त्यांना बाबा नेहमीच प्रोत्साहन देत असत.

---

**कोण जाणे बाबांचें मन। परी हें ग्रंथांचें संमेलन। व्यवहारदृष्ट्या अति पावन। श्रवणसाधन निजभक्तां।। शिरडी आतां स्थान पवित्र। देशोदेशींचे बाबांचे छात्र। होतील वेळोवेळीं एकत्र। ज्ञानसत्र मांडतील।। तेव्हां हे ग्रंथ येतील कामा। दप्तरांतून दावील शामा। स्वयें आपण जाऊं निजधामा। ग्रंथ प्रतिमा होतील।। ऐसे हे ग्रंथ परम पावन। असो शिरडी वा अन्य स्थान। वाचितां भक्तास व्हावी आठवण। संग्रहकारण असेल हें।। असो रामायण वा भागवत। परमार्थाचा कोणताही ग्रंथ। वाचितां रामकृष्णादिकांचें चरित। साईच दिसत मागें पुढें।। वाटे या ग्रंथांच्या विभूति। साईच नटला ते ते स्थिति। श्रोते वक्ते नित्य देखती। समोर मूर्ति साईंची।।**

---

श्री साईबाबांची ही बोध-पद्धती समोर ठेवून विद्यमान विश्वस्त मंडळाने ज्ञानेश्वरीसप्तशताब्दी वर्षानिमित्त बुधवार, दिनांक २०-२-१९९१ ते गुरुवार, दिनांक २८-२-१९९१ या कालावधीत शिरडी येथे श्री ज्ञानेश्वरी व श्री साईसच्चरिताचा सामुदायिक पारायण सोहळा मोठ्या प्रमाणावर आयोजित केला होता.

धार्मिक ग्रंथांद्वारे समाजाला शिक्षित करण्याचे श्री साईबाबांचे मौलिक कार्य संस्थानद्वारा आजही कायम आहे. संस्थानची स्वत:ची प्रकाशन व्यवस्था असून श्री साईबाबांवरील संस्थान प्रकाशित मराठी, हिंदी, गुजराथी, कन्नड, तेलुगु, तामीळ, सिंधी आदी भाषांतील पुस्तकांना सतत मागणी असते. ह्या पुस्तकांच्या कितीतरी आवृत्त्या आतापर्यंत प्रकाशित झाल्या आहेत. श्री साईबाबांचे वेगवेगळ्या आकारातील बहुरंगी फोटो संस्थानने प्रकाशित केले असून त्यांनाही वाढती मागणी आहे. पुस्तके व फोटो यांची सारखी वाढणारी मागणी व त्यामुळे बुक-स्टॉलवर होणारी गर्दी लक्षात घेऊन पुस्तके व फोटो-विक्रीसाठी संगणकाचा वापर करण्यात येत आहे. संस्थानचे 'श्री साईलीला' हे नियतकालिक असून ते मराठी व इंग्रजी-हिंदी भाषेत प्रकाशित केले जाते. विद्यमान विश्वस्त मंडळाने या नियतकालिकाला मोठा आकार व लोभसवाणं रूप प्राप्त करून दिलं आहे. संस्थानचे शिरडी येथे एक वाचनालय असून या ठिकाणी भक्त व ग्रामस्थांसाठी विविध विषयांवरील पुस्तकं उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

विद्यमान विश्वस्त मंडळाने दोन वर्षापूर्वी शिरडी येथे **इंग्रजी माध्यमाची शाळा** सुरू केली असून शिरडी व आजूबाजूच्या जवळपास १५ कि.मी. अंतरावरील गावांतील विद्यार्थ्यांना याचा लाभ होत आहे. विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी शाळेला एक स्कूल-बस उपलब्ध करून देण्यात आली आहे. या शाळेत १ ली ते ५ वीपर्यंतचे वर्ग असून एकूण विद्यार्थ्यांची संख्या ३८२ आहे. या शाळेची स्वतंत्र इमारत असून विभागातील एक प्रथित यश विद्यालय म्हणून ही शाळा नावारूपाला आली आहे.

मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन द्यायचे शासनाचे धोरण लक्षात घेऊन विद्यमान विश्वस्त मंडळाने चालू शैक्षणिक सत्रापासून शिरडी येथे पाचवी ते आठवी हे वर्ग असलेली कन्याशाळा सुरू केली आहे. या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

शिरडी व जवळपासच्या गावांतील तरुणांना नोकरी मिळविण्यासाठी किंवा स्वत:चा उद्योगधंदा चालू करता यावा, या उद्देशाने संस्थानद्वारा शिरडी येथे एक औद्योगिक प्रशिक्षण संस्था चालविण्यात येते. या संस्थेत वायरमन, मोटार-दुरुस्ती, ट्रॅक्टर-दुरुस्ती ह्या औद्योगिक शिक्षणक्रमांबरोबरच विद्यमान विश्वस्त मंडळाने त्यात वेल्डर, फिटर, रेडिओ-टी.व्ही. दुरुस्ती, मशिनिस्ट प्लंबर, टेलरिंग-कटिंग इत्यादी शिक्षणक्रमांची भर घातली आहे. ही औद्योगिक प्रशिक्षण संस्था औद्योगिक प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या सर्वप्रकारच्या उपकरणांनी सुसज्ज आहे.

गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, या हेतूने संस्थानच्या वतीने दरवर्षी शिष्यवृत्त्या दिल्या जातात.

विद्यमान विश्वस्त मंडळाने शिरडीत येणाऱ्या भाविकांसाठी पुरेसे व शुद्ध पाणी उपलब्ध केले आहे. भाविकांना आता पाण्याची कमतरता बिल्कुल भासत नाही. त्याचप्रमाणे वेळोवेळी पाण्याची तपासणीही करण्यात येते.

श्री साईबाबांनी आपल्या अवतारकार्यात एकदा शिडी लावून देणाऱ्या एका व्यक्तीला त्याच्या कामाचा मोबदला म्हणून दोन रुपये चट्कन काढून देत म्हटले, **''काम करणाऱ्याला त्याच्या कामाचे उचित दाम दिले पाहिजे.''**

श्री साईबाबांचा अमूल्य संदेश संस्थानने अंमलात आणला आहे. संस्थानमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर संस्थानच्या उत्पन्नातील दोन-तृतीयांश हिस्सा खर्च होतो. संस्थानच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे वेतन व अन्य सुविधा दिल्या जातात. कर्मचारी व त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींना मोफत वैद्यकीय व शैक्षणिक मदत दिली जाते. संस्थानने कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी दोन इमारती बांधल्या आहेत. त्यांना स्वत:चे घर बांधता यावे यासाठी कर्ज देण्याचा प्रस्ताव विद्यमान विश्वस्त मंडळाच्या विचाराधीन आहे.

श्री साईबाबा नेहमी सांगत असत,

**''सर्व प्राण्यांना आपलंच आत्मस्वरूप समजलं पाहिजे, प्राणिमात्रांमध्ये आत्मदर्शन केलं पाहिजे.''**

श्रीमती तर्खड यांनी शिरडीत जेव्हा एकदा एका भुकेल्या कुत्र्याला भाकरीचा तुकडा खाऊ घातला तेव्हा बाबांनी त्यांना धन्यवाद देत प्रेमाने म्हटले,

**''सर्व प्राण्यांच्या आकारात मीच डोलत आहे. सर्व जीवांत मीच वास करीत आहे. जो ह्या सर्व जीवांत माझे दर्शन करतो, तो मला अत्यंत प्रिय आहे. म्हणून द्वैत वा भेदभाव विसरून तुम्ही माझी सेवा करा!''**

एकदा संध्यासमयी लक्ष्मीबाईंनी बाबांसाठी भाजी-भाकर आणली तेव्हा बाबांनी स्वत: भुकेले असूनही भुकेल्या कुत्र्याला ती खाऊ घातली आणि ते लक्ष्मीबाईला म्हणाले,

**''कुत्र्याची भूक शांत करणे म्हणजे मला तृप्त केल्यासारखेच आहे. कुत्र्यालाही आत्मा आहेच की!''**

श्री साईबाबांची ही भूतदयेची शिकवण समोर ठेवून विद्यमान विश्वस्त मंडळाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी १९९२च्या मे महिन्यात शिरडीत एका छावणीचे आयोजन केले होते. जवळजवळ ४०० जनावरे या छावणीत दाखल होती.

श्री साईबाबांनी आपल्या अलौकिक कार्याने पुन्हा समाजाला दाखवून दिले की **''ईशावास्यमिदं सर्वम्''** मानणारा हिंदू धर्म व मनुष्याला **''वाहिद उम्मत''** मानणारा मुस्लिम धर्म यांचं मूलभूत तत्व एकच आहे.

बाबांचा हा उद्देश लक्षात घेऊन विद्यमान विश्वस्त मंडळाने दिनांक १ व २ फेब्रुवारी, १९९२ असे दोन दिवस मुंबईत एक 'प्रथम अखिल भारतीय साईभक्त संमेलन' आयोजित केले होते. त्यावेळी श्री साईबाबांच्या पवित्र पादुका शिरडीहून शोभायात्रेने मुंबईत आणण्यात आल्या होत्या. याला लोकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

संस्थानचे कर्मचारी केवळ मंदिरच नव्हे, तर संस्थानचा संपूर्ण परिसर स्वच्छ ठेवीत असतात. म्हणूनच संस्थानपरिसरातील वातावरण नेहमीच प्रफुल्लित असतं व भाविकांना येथे पुन्हा पुन्हा यायची ओढ लागते.

संस्थानच्या विविध विभागांमध्ये समन्वय रहावा या हेतूने विद्यमान विश्वस्त मंडळाने स्वत:ची एक **स्वतंत्र अंतर्गत संपर्क व्यवस्था** तयार केली आहे. यामुळे कामाचे सुलभीकरण झाले असून त्यात सहजता आली आहे. ही संपर्क व्यवस्था व्यवस्थित चालावी यासाठी ८+२५६ लाईनचे (मेल्ट्रॉन इ.पी.बी.ए.एक्स.) टेलीफोन एक्सचेंज येथे कार्यरत आहे. संस्थानचे कामकाज वाढल्याने संस्थानच्या मुंबई कार्यालयाशी सतत संपर्क रहावा यासाठी इलेक्ट्रॉनिक टेलिप्रिंटर सर्व्हीस सुरू करण्यात आली आहे.

योग्य व शीघ्र कामकाजासाठी संस्थानमध्ये अधिक प्रगत अशी **संगणक व्यवस्था** करण्यात आली आहे. या व्यवस्थेद्वारे 'श्री साईलीला' सदस्यांच्या वर्गणीची माहिती, उदी-प्रसाद पाकिटे, निमंत्रण पत्रिका, जमाखर्च व त्यासंबंधीचे अन्य काम, कायम स्वरूपातील अमूल्य वस्तूंची व्यवस्था, मनिऑर्डर्स, चेक्स्, डी.डी. आदी काम केले जाते.

**संस्थानची जमा रक्कम अधिक व्याज देणाऱ्या योजनांमध्ये** ठेवण्याची पद्धत विद्यमान विश्वस्त मंडळाने अंगिकारल्यामुळे साहजिकच संस्थानचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली आहे.

संस्थानच्या विकासासाठी विद्यमान विश्वस्त मंडळाने विविध योजना आखल्या असून काहींनी साकार रूप धारण केले आहे. **विमानतळ, एस्.टी. आदि परिवहन सोयी** शासनाच्या सहकार्याने गतिशील व वक्तशीर व्हाव्यात यासाठी आटोकाट प्रयत्न करणे, संस्थानपरिसरात विखुरलेल्या संस्थानच्या वेगवेगळ्या विभागांच्या कार्यालयांना एकाच इमारतीत आणणे, **श्री साईबाबांनी हाताळलेल्या वस्तूंच्या सुरक्षिततेसाठी वस्तुसंग्रहालय** इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण योजनांचा कार्यारंभ नजिकच्या काळात होणार आहे.

मंदिरपरिसराच्या विस्ताराच्या भूमीपूजनप्रसंगी संस्थानच्या अध्यक्षा यांच्या संस्थानच्या कामकाजाला अधिक गती मिळावी म्हणून २०० एकर जमिनीच्या मागणीवर अवश्य विचार केला जाईल, असे आश्वासन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी दिले. त्याचप्रमाणे पंतप्रधानांच्या हस्ते 'साईबाबा भक्त निवास'च्या उद्घाटनाच्या वेळी सर्व साईभक्तांच्या वतीने संस्थानच्या अध्यक्षा यांनी केंद्र सरकारला विनंती केली की सर्वधर्मसमभावाचे प्रतीक श्री साईबाबा यांच्या अमृतमहोत्सवी पुण्यतिथीच्या निमित्ताने एक टपाल तिकिट प्रकाशित करण्यात यावे.

अशाप्रकारे शिरडीची यात्रा करणाऱ्या भाविकांची शिरडीवारी अधिकाधिक संतोषप्रद व्हावी, येथील ग्रामस्थांना जास्तीतजास्त नागरी सुविधा उपलब्ध व्हाव्यात व 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' हे एक आदर्श देवस्थान म्हणून जगाच्या नकाशावर अग्रक्रमी गणलं जावं यासाठी प्रा. डॉ. लेखा पाठक यांच्या कार्यकुशल नेतृत्वाखाली विद्यमान विश्वस्त मंडळ सतत कार्यरत आहे.


॥ साई म्हणें तोचिं,
तोचि झाला धन्य ॥

# साईकृपा

॥ झाला जो अनन्य
माझ्या पायी ॥

वर्ष ७२ | अंक ४-५ | • श्री साईंच्या कृपाप्रसादाचे वार्तापत्र • | जुलै-ऑगस्ट, १९९३


## प्रत्यक्ष ऑपरेशनच्या वेळी बाबा उपस्थित होते !






(सौ. सुदर्शन कौर, कुर्ला (पूर्व), मुंबई यांच्याकडून):

**श्री** साईबाबांवरील अढळ भक्तीमुळे आम्ही बाबांच्या कृपाप्रसादाचा एकदा अद्‌भुत अनुभव घेतला. माझा मुलगा रतनजितसिंग त्यावेळी फक्त चार वर्षाचा होता. वैद्यकीय तपासणीत त्याच्या हृदयाला होण्यासाठी डॉक्टरांनी त्याला त्यांच्या चेकअपमध्ये तीन वर्षे ठेवण्याचा सल्ला दिला. तीन वर्षानंतर जेव्हा आम्हाला तारीख मिळाली तो महिना जूनचा होता. पाऊस जोराचा होता. ॲडमिट करण्यासाठी अवधी तीन दिवसांचा होता. त्याचवेळी माझ्या मुलाने हट्ट धरला, आधी मला शिरडीला घेऊन चला ! मगच मला ॲडमिट करा ! काय करावं, तेच सुचेनासं झालं.... आणि डोक्यात, एकदम लख्ख वीज चमकावी, तसं झालं.... आणि अनाहूतपणे अनुमती मिळाली. दुसऱ्याच दिवशी सकाळी काशी एक्सप्रेसने मी मुलाला घेऊन शिरडीला पोहचले, बाबांचं मनसोक्त दर्शन घेतलं आणि रविवारी पंचवटीने आम्ही घरी परतलो. सोमवारी बाबांचे नाव घेऊन आम्ही रतनजितसिंगला ॲडमिट केले.

ज्यावेळी त्याला ऑपरेशन थिएटरमध्ये नेले जात होते, तेव्हा माझ्या पतीने बाबांची विभूती त्याच्या मस्तकी लावली आणि त्याला धीर देत ते म्हणाले, सांगितलं.... आणि मला ग्लानी येऊ लागली. त्याचवेळी कुणीतरी आल्याची चाहूल मला लागली.... झोपेच्या



आधीन होत असल्याने स्पष्ट काही दिसत नव्हते; परंतु जाणीव मात्र झाली.... होय ! बाबाच आले होते आणि माझ्या डोक्याच्या बाजूला येऊन उभे राहिले. नंतरचं मला काहीच कळलं

# ‘दूर-दूरे बाबा’ म्हणजेच श्री साईबाबा !

(श्री. अविनाश पाध्ये, बोरिवली, मुंबई यांच्याकडून):



**मी** एक साईभक्त आहे. श्री साईबाबांचे सत्चरित्र, कथा, कविता वाचण्याची मला फार आवड आहे. आपणही बाबांविषयी काहीतरी नाविन्यपूर्ण असे लिहावे, अशी मला इच्छा झाली. काय लिहावे ते मात्र सुचत नव्हते. शेवटी श्री बाबांना नमस्कार करून म्हणालो, तुम्हीच काहीतरी मार्ग दाखवा! योगायोगाने १९९२ मध्ये औरंगाबाद जिल्ह्यात जाण्याचा योग आला. कन्नड तालुक्यामध्ये पळशी, पिशोर, करंजखेड, हस्त ह्या भागांत फिरलो. पळशी गावी आमचे नातेवाईक आहेत तेथे रहाण्याचा योग आला. रात्री गप्पा-गोष्टी चालू झाल्या. आमच्यामध्ये एक वृद्ध सद्गृहस्थ होते. सहज म्हणून त्यांना विचारले,

‘‘श्री साईबाबा तुमच्या भागात होते, हे खरे का? तुम्हाला त्यांच्याविषयी काही माहिती आहे का?’’

ते सद्गृहस्थ सांगू लागले.... आमच्या वडिलांनी जे सांगितले ते तुम्हाला सांगतो.... ‘करंजखेड’ गावाजवळ एक १५ ते १६ वर्षाचा तेजस्वी तरूण पांढरी पायघोळ कफनी व डोक्याला पांढरे फडके बांधून झाडाखाली दगडावर ध्यानस्थ बसत असे. दिवस-रात्र तो जंगलामध्ये असे. कोणाकडेही जात नसे. गावापासून दूर-दूर राहात असे. गुराखी मुलांमध्ये खेळत, मिसळत असे. परंतु तो त्यांच्याबरोबर गावात जात नसे. तो गुराख्यांना चमत्कार दाखवून चकित करीत असे. त्याचवेळी या भागात दुष्काळ पडला. माणसांना, गुरांना पाणी मिळेनासे झाले. पाण्यासाठी इथला प्रत्येक ‘जीव’ वणवण फिरू लागला. मुलांनी बाबांना ही हकिगत सांगितली. बाबांनी शांतपणे सर्व ऐकून घेतले आणि म्हणाले, चला माझ्याबरोबर पाणी शोधायला. काही अंतर चालत गेल्यावर बाबांनी सांगितले, येथे खणा! येथेच पाणी लागेल. मुलांनी खणायला सुरूवात केली, तो ८-१० फूटावरच भरपूर पाणी लागले. मुलांना खूप आनंद झाला. ही सर्व हकिगत वाऱ्यासारखी गावात पसरली. गावातील लहान-थोर मंडळी श्री बाबांना पहाण्यासाठी जंगलात आली. श्री बाबा दगडावर शांत बसले होते. सर्वांनी बाबांचे दर्शन घेतले आणि विनंती केली की बाबांनी त्यांच्याबरोबर गावात यावे. बाबांनी त्यांचे काहीएक ऐकले नाही. ते दूर-दूर गेले. गावकरी बाबांना शोधून आणीत आणि पाणी कुठे लागेल ते विचारीत. श्री बाबांनी जागा दाखविली की ८ ते १० फूटांवर भरपूर पाणी लागत असे. बाबा पुन्हा गावापासून दूर-दूर जात असत.

लोक त्यांना ‘दूर-दूरे’ बाबा असे म्हणत. पुढे ते त्या भागातून नाहीसे झाले व धूप खेड्याजवळ पुन्हा दिसले. त्यांची व चाँदभाईची भेट झाली. त्याच्या मेव्हण्याच्या लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर ते शिरडीला पुन्हा आले. सर्वांबरोबर राहून आपले ‘श्री सद्गुरू साईबाबा’ झाले. मला ही मोलाची माहिती व श्री बाबांविषयी काही लिहिण्याची इच्छा बाबांच्या कृपेने पूर्ण झाली.

---

एक लहान छिद्र आढळले. त्यावर इलाज म्हणून डॉक्टरांनी ‘ओपन हार्ट सर्जरी’ करावी लागेल, असं सांगितलं.... आणि आमच्या तोंडचं पाणीच पळालं. तरीही, बाबांवर अढळ श्रद्धा असल्याने आम्ही या गंभीर प्रसंगाला सामोरं जायचं ठरविलं. सर्वकाही बाबांवर सोपवून मन घट्ट केलं.

श्री संत कबिरांनी म्हटलेच आहे :

**दु:ख में सिमरण सब करें,**
**सुख में करे न कोई।**
**सुख में सिमरण जो करें,**
**तो दु:ख काहे का होय ।।**

आमच्या घरात बाबांची पूजा रोज होते. माझे पती रेल्वेत कामाला आहेत. आम्ही तीन-चार वेळा तरी बाबांच्या दरबारी जातो. मी तर शिरडी संस्थानला माझे माहेर समजून बाबांच्या चरणी आपली सेवा करीत असते. साईबाबांवर आम्हा सर्वांची श्रद्धा आहे. आम्ही मनोमन समजत होतो व समजत आहोत की श्री बाबांच्याच कृपेमुळे आम्हाला पुत्ररत्नाचा लाभ झाला. म्हणून त्याचे रक्षणही तेच करतील. बाबांचं नाव घेऊन आम्ही त्याला बाँबे हॉस्पिटलमध्ये नेलं. त्याच्या तब्बेतीत थोडी सुधारणा

बेटा! छोटसंच ऑपरेशन आहे. घाबरू नकोस. तू लवकरच बरा होशील.

तसा तो फार हुशार आहे.

तो पटकन म्हणाला,

पप्पा! मी ऑपरेशन झाल्यावर बाबांच्या दर्शनासाठी जाणार आहे. एक-दोन दिवसांसाठी नाही, तर पुरे दहा दिवस रहाणार आहे. तुम्ही मला नेणार ना? हे त्याचे भावपूर्ण शब्द ऐकून यांच्या डोळ्यात पाणी आले. यांनी त्याच्याकडे अश्रूपूर्ण नेत्रांनी पाहिलं आणि होकारार्थी मान डोलावली.

रतनजितसिंगचे ऑपरेशन एक तास चालले. दोन तासांनी डॉक्टरांनी बाहेर येऊन आम्हाला ऑपरेशन यशस्वी झाल्याचे व मुलगा ठीक असल्याचे सांगितले. आम्ही त्याला काचेतून पाहिले. तेव्हा कुठे आमचा जीव भांड्यात पडला. कळत-नकळत हात जोडले गेले, डोळे मिटले गेले आणि बाबांच्या चरणी मी नतमस्तक झाले.

नंतर आठ दिवस त्याला इंटेसिव्ह केअर रूममध्ये ठेवण्यात आलं. नवव्या दिवशी त्याला वॉर्डमध्ये आणलं गेलं. तेव्हा आम्ही त्याला विचारलं,

बेटा! ऑपरेशनच्या वेळी तू घाबरला तर नाहीस ना?

हे ऐकून तो आश्चर्यचकितच झाला. प्रत्यक्ष ऑपरेशन सुरू होण्यापूर्वीचं ऑपरेशन थिएटरमधील वातावरणाचं तो वर्णन करू लागला....

मला एका ऑपरेशन टेबलावर ठेवण्यात आलं. माझ्या तोंडावर काहीतरी ठेवलं गेलं. सर्व डॉक्टरांनीही तोंडावर कापड बांधलं होतं. त्यांनी मला वन-टू-श्री असे अंक म्हणायला नाही. कारण तेव्हा मी ग्लानीत गेलो. मुलाच्या तोंडची प्रत्यक्ष हकिगत ऐकून आमच्या अंगावर रोमांच उभे राहिले. मन तर्क-वितर्काच्या पलीकडे गेले.... आणि उपस्थित सर्वांचे डोळे पाणावले, आनंदाश्रूंनी.

चार महिन्यांनी आम्ही बाबांच्या दर्शनाला शिरडीला जायचे ठरविले. त्यावेळी काही लोकांनी म्हटले,

अहो! मुलाने सांगितलं म्हणून काय झालं! तुम्ही गर्दीच्या ह्या दिवसांत दहा दिवस शिरडीला राहणार कसे?

आम्ही म्हणालो,


बाबांच्या कृपेने आता मुलगा बरा झाला आहे. आम्हाला खोली नाही मिळाली तरी चालेल. आम्ही हॉलमध्ये झोपू.

शिरडीला गेल्यावर खोली मिळाली. दिवाळीचे सुट्टीचे दिवस असल्याने खूपच गर्दी होती. म्हणून चार दिवसांसाठीच खोली मिळाली. त्यानंतर मुलाच्या आजीने व नंतर आत्याने खोली बुक केल्याने आठ दिवस आम्हाला खोलीत रहायला मिळाले. शेवटचे दोन दिवस आम्ही हॉलमध्ये काढले. असे एकूण दहा दिवस आम्ही शिरडीत राहिलो व मुलाचा हट्ट पुरविला. दिवाळीचा सण आम्ही बाबांच्या दरबारात साजरा केला.

बाबांच्या कृपेने मुलाची प्रकृती आता अगदी ठणठणीत आहे.

‘श्री साईलीला’बाबतच्या तक्रारींसाठी ‘श्री साईलीला’, ८०४-बी, साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-१४. या पत्त्यावर लिहावे.

# श्री साईबाबांनीच अगदी चमत्कारिकरीत्या प्रकाशन घडवून आणले !



(श्री. अमृत गडकरी, नांदेड यांच्याकडून):

हा प्रसंग लिहायचे धाडस मला श्री साईबाबांनीच दिले म्हणावे लागेल. तो दिवस होता ९ ऑगस्ट, १९९०. आम्ही हैद्राबाद मुक्ती संग्रामातील कार्यकर्ते. त्यातल्यात्यात समाजवादी आहोत. त्यावेळच्या बऱ्याच प्रसंगांचे वर्णन आणि संग्रामातील हुतात्म्यांचे स्मरण म्हणूनच एक पुस्तक छोटेसे लिहिले. 'मंतरलेले पाणी' हे त्या पुस्तकाचे नाव. आमची अशी इच्छा की पुस्तकाचे प्रकाशन नामदार शरदराव पवार यांच्या हस्ते व्हावे. तेही ९ ऑगस्टला क्रांति मैदानावर सकाळी ९ वाजता झेंडावंदनाच्या वेळी.

आता हे घडणार कसे ? पण माझा पक्का विश्वास,

''आपले साईबाबा नक्की हे घडवून आणणार !''

पुस्तकाची पृष्ठे आणि कव्हर-पेज साधना प्रेस, पुणे येथे जून, जुलैपर्यंत तयार होऊन पडली, बायंडरचे वडील वारले, अशा अनेक अडचणी आल्या.

नामदार शरदराव पवार आणि श्री. सुशीलकुमार शिंदे यांची भेट घेऊन ९ ऑगस्टच्या कार्यक्रमाला वेळ मागितली. खूपच मनस्ताप होऊन ५ ऑगस्टला ''बरं'' एवढाच शब्द मिळाला. प्रत्यक्ष भेटसुद्धा झाली नाही. कळले ते श्री. राजे, पी.ए. यांच्याकडून. नंतर पुण्याला जाऊन पुस्तकाच्या २५ प्रती घेऊन आलो. त्या कशा तयार झाल्या, काय झाले, हे खरोखरच 'बाबांना' माहीत ! आमचे सहकारी श्री. गुणवंतराव करडखेडकर हे वाट पहात आमदार निवास, मुंबईला पोहोचले होते.

८ ऑगस्टला नांदेड व मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांतील आमदारांना रात्री आठ-नऊला उद्याच्या कार्यक्रमाला यावे म्हणून प्रत्यक्ष सांगून आलो.

कार्यक्रमाला स्टेज लागेल वगैरे याची काहीही कल्पना नव्हती. ९ ऑगस्टला मैदानावर कार्यक्रम होता, तेथील स्टेजचा उपयोग करून घेऊ, असे मनाशी ठरविले. आम्ही दोघेच ट्रेनने ग्रँटरोड स्टेशनवर पुस्तकांचे पुडके शबनममध्ये घेऊन उतरलो.

क्रांति मैदानात भल्या सकाळी ७ वाजता आलो. तेथेही खूप मज्जा. दोन स्टेज, एक एम.पीं.सी.सी.चा, तर दुसरा बी.पी.सी.सी.चा. रात्री पाऊस पडल्यामुळे स्टेज अगदी प्राथमिक अवस्थेत. बांबू, दोऱ्या व फळ्या पडलेल्या. तेवढ्यात गुरूवर्य प्रा. प्रधानसर दिसले. आम्हाला खूपच आनंद झाला. देवासारखे समोर उभे ठाकलेले. रात्रीच आलो, म्हणाले झाले. परत आम्ही स्टेजकडे धावलो. तेथील प्रकार तर अगदी !.... 'बाबांनी' परीक्षाच घेतली. त्याचे काय झाले....

खासदार मुरली देवरा यांना नम्र विनंती केली, ''हैद्राबाद मुक्ती संग्रामावर एक पुस्तक लिहिले आहे. ते मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशित होणार आहे. तरी कृपा करून थोडा वेळ स्टेजवर द्यावा.''

त्यांचे उद्‌गार आश्चर्यकारकच होते. आम्ही दोघेही अक्षरश: हिरमुसले झालो. खेड्यांतील माणसांना कसे झिडकारले जाते, याची प्रचितीच बाबांनी आणून दिली.

मैदानावर पावसाचे ढग जमा झाले. काळोख पसरण्याएवढ्या काळ्याकुट्ट ढगांनी आकाश व्यापले गेले. मी आपला बाबांचा धावा तर क्षणाक्षणाला चालूच ठेवला होता. विश्वासच मुळी, कार्यक्रम होणारच म्हणून. काय आश्चर्य ! मुख्यमंत्री आले. झेंडावंदन झाले. सेवादलाच्या सलामी वगैरे घेऊन ते स्मारकाकडे निघून गेले. दोन्ही जवळजवळच होते. परत ते येणार की नाही, हे कळायला मार्गच नव्हता. असं वाटायचं कारण, पाऊस भरपूर भरला होता.

स्मारकाला पुष्पचक्र वाहून नामदार शरदराव पवार हे आम्हाला शोधत प्रा. प्रधानसर यांच्यासमवेत येऊ लागले. त्यांनी एवढ्या वेळात खासदार व बी.पी.सी.सी.चे अध्यक्ष यांना आमचा शोध घेऊन पुस्तक प्रकाशन करावयाचे आदेश देऊन टाकले होते. आमची शोधाशोध होईपर्यंत मुख्यमंत्री लव्याजम्यासह स्टेजजवळ पोहोचलेसुद्धा. आमच्या शबनमसह आम्ही स्टेजजवळ तयारीतच होतो.

कुठे आहे पुस्तक ? शरदरावांनी विचारणा केली. आम्ही पुढे होऊन प्रकाशनाकरिता तयार केलेल्या पाच प्रतींचे पुडके त्यांच्या स्वाधीन केले. वरील उत्तम व सुबक वेष्टण पाहून ते कसे फाडावे, अशा प्रश्नार्थक मुद्रेने ते पाहू लागले. आम्ही आमच्या मराठवाडी पद्धतीत सांगितले,

हं, फाडून टाकायचे जीवार !

त्यांनी ते फाडून प्रकाशन केले.


काळेकुट्ट ढग आकाशात पाऊस घेऊन आतुरतेने जमले होते, केव्हा एकदा हा कार्यक्रम संपतो आणि आम्ही वर्षाव करतो याची वाट पहात. माझा आपला साईबाबांचा धावा चालूच होता.

मुख्यमंत्र्यांचे हैद्राबाद मुक्ती आंदोलनावर भाषण झाले. खासदार देवरा बोलले. तसेच महाराष्ट्र प्रांतिक कमिटीचे अध्यक्ष श्री. सुशीलकुमार शिंदे यांचे भाषण झाले. मला विचारण्यात आले, आणखी कोण बोलणार ? आम्ही प्रधानसर यांचे नाव देवरांना सांगताच त्यांनाही आश्चर्य वाटले. तोपर्यंत सरांची भाषणास सुरवातसुद्धा झाली होती. कार्यक्रम घाईगडबडीत संपताच मुख्यमंत्री व त्यांचा लवाजमा मैदानातून मार्गी लागले. आम्ही स्टेजवर सरांबरोबर पुस्तके वाटत होतो. इतक्यात अक्षरश: मुसळधार पाऊस आला. आम्ही सर्व तर भिजून चिंब झालो. प्रा. प्रधानसरही ओले झाले. बाकीची मैदानावरील इतर सर्व स्थिती तर काय विचारता ! अगदी 'बघण्यासारखी' झाली होती. श्री साईबाबांच्या या विलक्षण चमत्काराने आम्हाला गहिवरून आले आणि आदराने मनोमन आमचे हात जोडले गेले 'त्या प्रभुच्या चरणी'.

या कार्यक्रमाची टी.व्ही. फित साडेसातच्या बातमीत प्रकाशित झाली आणि दिल्लीच्या हिंदी व इंग्रजी बातम्यांतही ती दाखविली गेली. याला योगायोग म्हणायचा की अद्‌भुत चमत्कार ? मी तर याला श्री साईबाबांचा 'श्रद्धा आणि सबुरी'चा प्रसाद समजतो.

# बाबांनी मृत्यूच्या कराल दाढेतून बाहेर काढले !

(श्री. विलास कोडाप, गडचिरोली यांच्याकडून):



**अं**दाजे १५ वर्षापासून मी श्री समर्थ सद्‌गुरू साईबाबांचा दास आहे. परम कृपाळू दयाघन श्री साईनाथ महाराज आपल्या भक्तांना वेळोवेळी संकटातून तारतात, हे सर्वश्रुत आहे. आम्हालासुद्धा श्री साईंनी वेळोवेळी संकटातून तारले आहे. याबाबतचा आमचा एक अनुभव यापूर्वी '**श्री साईलीला**'त प्रकाशित झालेला आहे.

नुकताच घडलेला प्रसंग.... प्रत्यक्षात माझा मृत्यूच ओढवलेला होता; परंतु दयाघन साईमाऊलीने मृत्यूच्या कराल दाढेतून मला बाहेर काढले आणि **''साई तारी त्याला कोण मारी''** या म्हणीचा प्रत्यय आणून दिला. त्यांच्याच कृपेने तो अनुभव मी येथे कथन करीत आहे. घटनेची पार्श्वभूमी अशी.... मी शिवसेनेचा गडचिरोली जिल्हा उपप्रमुख आहे. सन १९९० मधील विधानसभेची निवडणूक मी लढविली होती. त्यामध्ये अनपेक्षितरीत्या १६५० मतांनी मला पराजय पत्करावा लागला व काँग्रेसचा उमेदवार निवडून आला. याअगोदर मी शासकीय सेवेत लिपिक म्हणून कार्यरत होतो. निवडणुकीकरिता शासकीय नोकरीचा राजीनामा देवून निवडणूक लढविली होती. अशा या पार्श्वभूमीवर मला राजकीय शत्रू तर बरेच आहेत आणि स्पष्टवक्तेपणा व लोकांची सेवा करण्याची अंत:करणापासूनची तळमळ यामुळे माझी जनमानसातील प्रतिमा अधिकाधिक उजळ होत असल्याने काही मोजके अंतर्गत शत्रूही मला निर्माण झाले आहेत.

दिनांक २९-३-९३ रोजी सोमवारी रात्री नऊ-साडेनऊच्या सुमाराला घरीच साधसं जेवण केलं व शेजारच्या मुस्लिम बांधवाच्या पानठेल्यावर पान खायला गेलो. पान बनवीपर्यंत वेळ जावा म्हणून वृत्तपत्र चाळू लागलो. पान तयार झालं तसं ते तोंडात घालून मी माझं वाचन पुढे चालू ठेवलं. पाच-एक मिनिटांनी मला मळमळ वाटायला लागली व घाम सुटायला लागला. कुठचं काय ! तस्साच उठून मी घरी आलो. आराम करण्याचा प्रयत्न केला; परंतु जास्तच अस्वस्थ वाटायला लागलं. विशेष म्हणजे घसा कोरडा पडला होता व जीभ आत ओढल्यासारखी वाटत होती. जीभ बाहेर काढण्याचा प्रयत्न केल्यास ती उलट आत उलटी पडल्याप्रमाणे वाटत होती. एकंदरीत जीव कासावीस होत होता. त्याहीक्षणी दयाघन परम कृपाळू साईमाऊलीने प्रेरणा दिली. एकंदरीत लक्षणावरून मला विषबाधा झाल्याचा मला स्वत:लाच दाट संशय आला. म्हणून मी घशात बोटं घालून ओकारी काढली. तरीसुद्धा काहीच बरे वाटत नव्हते. तशा परिस्थितीतच मी स्वत:च डॉक्टरांना फोन केला. मी कुठल्याच प्रकारचा तंबाखू खात नाही व पानात तंबाखू टाकला नाही, असे पानपट्टीवाल्यानेही सांगितले होते.

माझी ही अवस्था पाहून माझी पत्नीसुद्धा घाबरली. तिने मला, बाबांची उदी देवू काय ? उदी पिवून बघा, असे म्हटले. लगेच मी '**बाबांची संजीवनी उदी**' पाण्यात मिसळवून प्राशन केली. थोड्याच वेळात डॉक्टर आले. त्यांनी मला तपासले व विषबाधेचा प्रकार झाल्याचे निदान करून मला शासकीय रूग्णालयात लगेच भरती होण्यास सांगितले. मी ताबडतोब ऑटोरिक्शा बोलावून सामान्य रूग्णालयात भरती झालो. तिथे डॉक्टरांनी लागलीच औषधोपचार सुरू केले. पाच मिनिटांतच पुन्हा ओकारी आल्यासारखे वाटू लागले. डॉक्टरांनी पुन्हा इंजेक्शन दिले व सलाईन लावले. आमचे फॅमिली डॉक्टर व श्री. कोहले हे माझ्यासोबत होते.

तेसुद्धा श्री साईबाबांचे एकनिष्ठ भक्त आहेत. श्री साईंच्या कृपेनेच डॉक्टरांची परिस्थिती संपन्न आहे. हे त्यांच्याच तोंडून मी अनेकदा ऐकले आहे. ते माझे निकटवर्ती स्नेही व माझ्या प्रत्येक विधायक कार्यात माझे हितचिंतक आहेत.

सामान्य रूग्णालयात डॉक्टरांनी मला सलाईन लावल्यानंतर मी बाबांचा धावा सुरू केला व तसाच झोपी गेलो. भल्या पहाटे जाग आली तेव्हा एकदम बरे वाटू लागले. तरीसुद्धा जीभ व ओठांवर काही अंशी परिणाम शिल्लक दिसत होता. तो पुढे २-३ दिवस राहिला. दुसऱ्या सकाळी (घटनेनंतरची दुसरी सकाळ) मी रूग्णालयातून सुटका करवून घेतली.

पानामधून विष देण्यात आले ? का इतर प्रकारातून विषबाधा झाली ? हा प्रश्न माझ्या दृष्टीने तेवढा महत्त्वाचा वाटत नाही; परंतु विषबाधा होवूनसुद्धा श्री साईमाऊलीने ऐन वेळेवर मला ओकारी (वांती) करण्यास सुचविले व पत्नीद्वारे '**उदीरूपी संजीवनी**' घेववली. त्यामुळेच मी आज जिवंत आहे, हे तेवढेच सत्य आहे.

बाबांनी दिलेल्या जीवदानाबद्दल काय लिहावे, कसे वर्णन करावे, हेच सुचत नाही. कारण श्री साईंची लीला कल्पनेच्याही पलीकडली आहे. इथे मनुष्याची बुद्धी निश्चितच थिटी पडते.

ज्याप्रमाणे परमकृपाळू साईश्वरांनी मला जीवदान दिले, त्याप्रमाणेच इतर भक्तांचीसुद्धा संकटे ते दूर करीत आहेतच, यात तिळमात्र शंका नाही.

श्री समर्थ सद्‌गुरू साईनाथ महाराजांच्या चरणी आमचे अनन्यभावे शतश: कोटी कोटी प्रणाम.

# संजीवनी !

(मनीषा रावराणे, डोंबिवली (पूर्व), ठाणे यांच्याकडून):

**बा**बांवर श्रद्धा ठेवली तर ते आपल्याला संकटातून तारून नेतात, असा अनुभव आम्ही कुटुंबियांनी अनेक वेळा घेतला आहे. नुकताच आलेला एक विलक्षण अनुभव येथे कथन करते.

गेल्या जूनमध्ये माझ्या तब्बेतीच्या किरकोळ तक्रारी सुरू झाल्या. पुढे डिसेंबरमध्ये पुन्हा ताप येऊ लागला. त्यावर उपाय म्हणून दोन दिवसाचे आमच्या डॉक्टरकडून औषध आणले. तिसऱ्या दिवशी नेमका आम्हाला शिरडी, शेगावचा प्रसाद शेजाऱ्यांकडून मिळाला आणि त्याच दिवशी ताप उतरल्यामुळे औषधाची गरज नसल्याचे डॉक्टरने सांगितले. आजारावर उपचार करणारे आम्ही डॉक्टर असतो; त्याला यश देणारे साईबाबाच असतात, असे आम्ही मानतो, असेही ते पुढे म्हणाले. काही दिवसांनी पुन्हा ताप यायला सुरूवात झाली, तेव्हा रक्त, क्ष-किरण तपासणी करून घ्यावी, असे डॉक्टरांचे मत पडले. आम्ही चिंताग्रस्त झालो; कारण जर आजार गंभीर असेल तर पुढील शिक्षण, व्यवसाय, विवाह हे सारं बिकट झालं असतं. म्हणून बाबांची मनोभावे प्रार्थना केली. तपासणीच्या दिवशी चिमूटभर उदी प्राशन केली, थोडीशी छातीला लावली आणि प्रत्यक्ष तपासणीच्या वेळीसुद्धा बाबांचे नामस्मरण करीत राहिले. विशेष म्हणजे तपासणी करणारे डॉक्टर हे आमचे ज्ञातीबांधव असल्याचे समजले. त्यांनी तपासणीचे रिपोर्ट नॉर्मल असल्याचे निदान केले. कामाची व प्रवासाची दगदग झाल्याने ताप येतो, असे अनुमान त्यांनी काढले. हे ऐकल्यावर हायसे वाटले !

# श्री साईबाबा आणि नरदेह

–ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)

अनंत पुण्याईच्या बळे आणि अवचटें जीवाला नरदेहाची प्राप्ती होते, हे आपण 'श्री साईबाबा आणि कर्म' व 'श्री साईबाबा आणि पुनर्जन्म' ह्या मागील लेखांत पाहिलेच आहे. या नरजन्मातच परमेश्वराची प्राप्ती होऊ शकते आणि जन्ममरणांच्या दु:खद फेऱ्यांपासून माणसाला सुटका करून घेता येते. तेव्हा माणसाने तो फुकट घालवू नये अशी साईबाबांची शिकवण होती:

नाहीं नरदेहापरी आन।
चारी पुरुषार्थ साधाया साधन।
जो नर अभ्यासपरायण।
तो नारायणपद पावें॥७७॥
म्हणूनि झालें न जों शरीरपतन।
आत्मज्ञानार्थ करा यत्न।
नरजन्माचा एकही क्षण।
उपेक्षून टाकूं नका॥७८॥

–अध्याय ८

आहेत जरी नाना योनी।
मानवचि श्रेष्ठ सर्वांहूनी।
आलें कोठुनी निर्मिले कोणीं।
विवेक–श्रेणी मानवीच॥५०॥
इतर योनी हें न जाणती।
उपजती तैशा नाश पावती।
भूतभावी वर्तमान गति।
ईश्वर स्थिति नेणती॥५१॥
म्हणोनि नरदेह निर्मून।
ईश्वर झाला आनंदसंपन्न।
कीं विवेकवैराग्यातें वरून।
नर मद्भजन करील॥५२॥
विनाशी नर करितां साधन।
होईल अविनाशी नारायण।
नरदेहासम साधनसंपन्न।
दुजा न आन ये सृष्टीं॥५३॥

–अध्याय ८

बाबा आणखी म्हणतात:

तेथेंही जो करीना सार्थक।
जन्मला भूभार तो निरर्थक।
पशूहून काय अधिक।
जगण्याचे सुख तयाला॥१८॥
आहार निद्रा भय मैथून।
यांहून कांहीं न जाणे जो आन।
तो नर केवळ पशूसमान।
पुच्छ–विषाण विरहित॥१९॥

–अध्याय १४

साईबाबा आणखी म्हणतात:

प्रत्यहीं उदय प्रत्यहीं अस्त।
वर्षांनुवर्षें जाहलीं फस्त।
अर्धा जन्म निद्रितावस्थ।
उरलाही स्वस्थ भोगवेना॥७॥
बाळपणीं क्रीडासक्त।
तरूणपणीं तरूणीरक्त।
वृद्धापकाळीं जराग्रस्त।
सदैव त्रस्त व्याधींनीं॥८॥
जन्मासी येऊनि पुष्ट होणें।
श्वासोच्छ्वास करीत राहणें।
दीर्घायुष्यवरी वांचणें।
हे काय केणें या जन्मीं॥९॥
परमात्मप्राप्ति हेचि साची।
इतिकर्तव्यता नरजन्माची।
नातरी श्वानसूकरादिकांची।
जीविकाचि काय उणी॥१०॥

–अध्याय ८

तसेच

करिता नित्य कुटुंबाची भर।
आयुष्य जातसे भराभर।
काळ आयुष्यगणना तत्पर।
कर्तव्य विसर त्या नाहीं॥३९॥
भरता अखेरची घडी।
मग तो थांबेना एक चिपडी।
धीवर जैसा जाळें ओढी।
मरणीं तडफडी जीव तैसा॥४०॥

–अध्याय ८

म्हणून

मानावा तो केवळ चाकर।
नका बैसवूं त्या डोक्यावर।
लाड न पुरवा निरंतर।
नरकद्वार करू नका॥३३॥
निर्वाहापुरतें अन्न आच्छादन।
तैसेंच तात्पुरते लालन पालन।
लावा आध्यात्मिक उन्नतीलागून।
जन्ममरण चुकवावया॥३४॥

–अध्याय ८

श्री साईबाबा आपल्या भक्तांच्या प्रापंचिक इच्छा पुऱ्या करीत असत, हे अगदी खरे आहे. नानासाहेब चांदोरकरांनी नारायणगावच्या भिमाजी पाटलाला म्हटले होते:

जो जें मागे त्या तें देई।
हें ब्रीद जयानें बांधिलें पायीं।
म्हणोनि म्हणतों करीं गा घाई।
दर्शन घेई साईंचे॥६०॥

–अध्याय १३

परंतु बाबांचे आध्यात्मिक विषय आवडणाऱ्यांवर विशेष प्रेम होते व त्यांची त्यात प्रगती होण्यासाठी ते आवर्जून साहाय्य करीत असत:

जया परमार्था खरी गोडी।
तयांची साईंस मोठी आवडी।
वारूनि सर्व तयांचीं सांकडीं।
स्वानंदजोडी दे तयां॥७५॥

–अध्याय ४१

नश्वर शरीरसौख्यीं उदास।
जया आत्यंतिक–सुखाची हौस।
ऐशिया भक्ताच्या परमार्थास।
परम उल्हास साईस॥३९॥

–अध्याय ५१

साईबाबांची तक्रारच होती:

मागती बहुत धनसंपदा।
निवारा म्हणती रोग आपदा।
मागती लौकिक मान राज्यपदा।
सौख्य सदा मागती॥४०॥
केवळ ऐहिक सुखालागुनी।
जन शिरडीस येती धांवुनी।

लागती मज फकीराचे भजनीं।
ब्रह्म कोणीही न मागती॥४१॥

–अध्याय १६

म्हणून जे जे आपले भक्त असतील त्यांना साईबाबा आपण होऊन ओढून आणीत असत. उदाहरणार्थ:

(१) नानासाहेब चांदोरकरांना वारंवार निरोप पाठवून आपल्याकडे बोलावून घेतले.

(२) मुंबईच्या लखमीचंदाला आणि पंजाबी रामलालला स्वप्नात दर्शन देऊन शिरडीला ओढून आणले.

(३) ब्ऱ्हाणपूरच्या बाईच्या स्वप्नात जाऊन खिचडी मागितली आणि पतीसह शिरडीस येण्याची स्फूर्ती दिली.

बाबा नेहमी म्हणत:

माझा माणूस देशावर।
असो कां हजारों कोस दूर।
आणीन जैसे चिडीचे पोर।
बांधून दोर पायांस॥१५॥

–अध्याय २८

एवढेच काय, इतर देवांची किंवा संतांची जे पूर्वी भक्ती करीत होते, पण आता ते विसरले होते, त्यांनाही बाबा या ना त्या निमित्ताने आपल्याकडे बोलावून त्यांना त्या देवाची किंवा संताची भक्ती करण्याची आठवण देऊन पुन्हा परमार्थाकडे लावीत असत. उदाहरणार्थ:

(१) भगवंतराव क्षीरसागरांचे वडील पंढरपूरच्या विठोबाचे भक्त होते. ते पंढरपूरची वारंवार फेरी करीत असत आणि घरातील विठ्ठलमूर्तीचा पूजानैवेद्य नित्यनेमाने करीत असत. परंतु वडील वारल्यावर भगवंतरावांनी ते सर्व बंद केले आणि विठ्ठलमूर्तीचा पूजानैवेद्यही समाप्त झाला. तेव्हा शिरडीस आल्यावर भगवंतरावांकडे बोट दाखवून बाबा सर्वांना म्हणाले:

"हा त्या माझ्या स्नेहाचा सुत।
म्हणूनि यासी मीं आणिला खेंचित।
नाहीं कधीं हा नैवेद्य करीत।
उपाशी ठेवीत मजला ही॥१००॥
विठ्ठलासही ठेवी उपाशी।
म्हणूनि शिरडीसी आणिलें यासी।
आतां देईन आठवणीसी।
लावीन पूजेसी याजला॥१०१॥"

–अध्याय ४

(२) मुंबापुरस्थ हरिश्चंद्र पितळे आपल्या अपस्मार-व्यथाग्रस्त मुलाला शिरडीला घेऊन गेले असताना व त्याला आराम पडून ते परत यावयास निघाले असताना त्यांना पूर्वी अक्कलकोट स्वामींनी दिलेल्या दोन रुपयांची आठवण देऊन साईबाबांनी पितळ्यांना पुन्हा अक्कलकोट स्वामींच्या भक्तीला लावले. या गोष्टीवरून पितळ्यांची म्हातारी आईच त्यांना म्हणाली:

तरी आता येथूनि पुढें।
सोडूनि द्यावे तर्क कुडे।
पहा आपल्या पूर्वजांकडे।
नको वांकडे व्यवहार॥१०८॥
करीत जा रुपयांचे पूजन।
संतप्रसाद माना भूषण।
समर्थसाईंनी ही पटविली खूण।
पुनरुज्जीवन भक्तीचें॥१०९॥

–अध्याय २६

(३) सांताक्रूझच्या रा. ब. प्रधान यांना त्यांच्या घराण्यांचे गुरू हरिबुवांकडून गुरूमंत्र मिळाला होता. पण त्याबद्दल प्रधानांना फारसा आदर नव्हता व ते तो नियमितपणे जपतही नसत. एकदा बाबा मशिदीच्या पटांगणात चूल पेटवून भक्तांना व गोरगरीबांना वाटण्याकरिता हंडीत अन्न शिजवीत होते. त्यावेळी बाबा मोठ्या रागात होते आणि कोणालाही जवळ येऊ देत नव्हते. परंतु प्रधानांना व नानासाहेब चांदोरकरांच्या दोन लहान मुलांना त्यांनी जवळ येऊ दिले. त्यावेळी हंडीतील उकळते अन्न ढवळीत असताना बाबा काहीतरी गुणगुणत असल्याचे प्रधानांना वाटले. म्हणून ते नीट लक्ष देऊन ऐकू लागले, तर ते शब्द होते, **"काय रे, आपण काय म्हणावे, श्रीराम जय राम जय जय राम"**. अगदी प्रधानांना मिळालेला पूर्वीचा गुरूमंत्रच. लगेच प्रधानांना गहिवरून आले आणि त्यांनी बाबांच्या चरणांवर मस्तक ठेवले. आपण या मंत्राबद्दल निष्काळजीपणा करीत असल्याचा प्रधानांना पश्चात्ताप झाला. असो.

काही भक्तांना तर साईबाबांनी हट्टाने अनेक उपायांनी परमार्थास लावले, तर काही वाट चुकलेल्या, पण मूळातच अध्यात्माची योग्यता असलेल्यांना वेळप्रसंगी आपल्या सिद्धींचा उपयोग करूनही आपल्याजवळ पकडून ठेवले आणि त्यांची अध्यात्मात उच्च प्रगती करवून दिली:

(१) शामा उर्फ माधवराव देशपांडे हे तर साईबाबांचे अगदी निकटवर्तीय व लाडके भक्त होते. त्यांच्या परमार्थाची काळजी बाबांना असणार यात नवल नाही. पण त्यासाठी पहा, बाबा खोटे बोलले, एवढेच नाही, तर त्यांनी चोरीही केली. एकदा एक रामदासी बुवा शिरडीस आला. तो नित्यनियमाने बाबांसमोर मशिदीत बसून अध्यात्म रामायणाचे पारायण आणि श्री विष्णुसहस्त्रनामाचे पठण करीत असे. एके दिवशी बाबांच्या मनात आले की माधवरावांना संसारात सुखशांती प्राप्त होण्यासाठी परमार्थाचा काही नियम लावावा. त्यांनी रामदाश्याला जवळ बोलावून खोटेच म्हटले, "माझ्या पोटात फार कळ उठली आहे. आतडीच जणूकाय तुटून पडत आहेत. सोनामुखीची फाकी मारल्याशिवाय पोटाची रुखरुख राहणार नाही. बाजारात जाऊन थोडी सोनामुखी घेऊन ये!" रामदासी बिचारा भावार्थी आणि आज्ञावर्ती. त्याने पोथीत खूण ठेवली आणि धावत बाजारात गेला. इकडे बाबांनी काय केले? आसनावरून तात्काळ उठले आणि पोथीजवळ गेले. तेथे इतर पोथ्यांत श्री विष्णुसहस्त्रनामाची पोथी होती, ती उचलून घेतली आणि आपल्या जागी येऊन बसले. नंतर शामाला जवळ बोलावून म्हणाले:

म्हणती "शामा ही पोथी कनी।
पाहे पहा बहुगुणी।
म्हणून देतो तुजलागुनी।
ती त्वां वाचूनि पहावी॥७४॥
एकदा मज उपजली नड।
काळीज करू लागले धडधड।
झाली जीवाची चडफड।
दिसे न धडगत माझी मज॥७५॥
ऐसिया या प्रसंगाला।
काय सांगू शामा मी तुजला।

या पोथीचा जो उपयोग झाला।
हा जीव तरला तिचेनी ॥७६॥
म्हणोनि शामा ही तुजला नेई।
ओजें ओजें वाचीत जाई।
रोज एकादें अक्षर घेई।
आनंददाई ही मोठी'' ॥७८॥

शामरावांनी ती घेण्याला बरेच आढेओढे घेतले. रामदासी मोठा खाष्ट आहे. तो रागावेल. पोथीची संस्कृत लिपी मला वाचायला जमणार नाही. असे पुष्कळ सांगून पाहिले. पण बाबांनी ते ऐकले नाही. रामदासी परत आल्यावर तो शामावर चिडला. पण बाबांनी त्याला शांत केले आणि ती पोथी शेवटी शामाच्या गळ्यात बांधलीच. पुढे याच शामरावांना काका महाजनींची एकनाथी भागवताची पोथी आग्रहाने संग्रही ठेवण्यास बाबांनी दिल्याचे व मथुरा, काशी, अयोध्या व गयाची यात्रा मोठ्या ऐषारामात करवून दिल्याचे आपण वाचलेच आहे.

(२) बाळासाहेब उर्फ पुरुषोत्तम सखाराम भाटे हे पूर्वी मुक्त विचाराचे, चैनी व कुठल्याही बाबतीचा गंभीर विचार न करता आयुष्याची मजा लुटणारे गृहस्थ होते. ते कोपरगाव येथे सन १९०४-१९०९ साली मामलतदार असताना बाबांच्या गोष्टी कानावर आल्यावर ते त्यांना वेडा फकीर म्हणून झिडकारीत व शिरडीला वारंवार जाणाऱ्या लोकांची टिंगलही करीत असत. एकदा त्यांच्या मित्रांनी त्यांना सुचविले की तुम्ही शिरडीस जाऊन प्रत्यक्ष बाबांना पहा आणि मगच आपले मत बनवा. यावरून ते शिरडीस गेले आणि पाच दिवस तेथे राहिले. पाचव्या दिवशी बाबांनी त्यांच्या अंगावर भगवे वस्त्र पांघरले आणि त्याक्षणीच बाळासाहेबांमध्ये विलक्षण स्थित्यंतर झाले. त्यांना काम करण्यात व पैसा कमविण्यात गोडी लागेना आणि त्यांची एकमेव इच्छा शिरडीस राहण्याची, आयुष्यभर बाबांची सेवा करण्याची व त्यांच्यासमोरच देहत्याग करण्याची झाली. साईबाबांनी काकासाहेब दीक्षितांकडून एक वर्षाच्या रजेचा अर्ज लिहवून त्यावर भाटेंची सही घेवविली. कलेक्टर साहेबांनी भाटे तोवर ताळ्यावर येतील म्हणून तो मंजूर केला. परंतु त्यानंतरही भाट्यांमध्ये काही बदल न झाल्याने धार्मिक विषण्णता (religious melanchotia) या सबबीवर निवृत्त करून दरमहा रु. ३० पेन्शन दिली. पुढे भाटे शिरडी येथेच राहिले आणि नंतर त्यांची पत्नी व इतर कुटुंबातील माणसेही त्यांच्याजवळ येऊन राहिली. भाटे आपले नित्य कर्म आटोपून रोज बाबांपुढे उपनिषदे वाचीत असत व मधूनमधून बाबा स्वत: त्यावर उपयुक्त भाष्यही करीत असत. भाटे भाग्यवान तर खरेच! बाबांची उत्तरक्रिया करण्याचा मान त्यांना मिळाला. उगाच नाही त्यांना हेमाडपंतांनी श्रीसाईसच्चरितात **'भक्तरत्न'** या विशेषणाने संबोधिले आहे.

(३) दासगणू उर्फ गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे हे पोलिसमध्ये नोकरी करीत होते. त्यांना तमाशाचा फार नाद होता आणि ते लावण्याही रचीत असत. बाबांकडे आल्यावर बाबांनी त्यांना पोलिस खात्याची नोकरी तर सोडावयास लावलीच, पण त्यांच्या काव्यस्फूर्तीला योग्य वळण लावून त्यांच्याकडून अर्वाचीन संतांची चरित्रे व आणखीही पुष्कळ आध्यात्मिक साहित्य लिहवून घेतले. एवढेच नव्हे, तर ९५ वर्षांचे दीर्घ आयुष्य देऊन महान 'संतकवी' म्हणून प्रसिद्धीसही आणले.

(४) साकोरीचे उपासनी महाराज उर्फ काशिनाथ गोविंद उपासनी यांनी शिरडीला यावयाच्या आधी योगाभ्यासात व अध्यात्मात बरीच प्रगती केलेली होती. परंतु त्यात काही चुका होऊन बऱ्याच अडचणी येत होत्या. बाबांनी उपासनींची इच्छा नसताना बळजबरीने त्यांना शिरडीला ठेवून घेतले आणि चार वर्षे खंडोबाच्या देवळात बसावयास लावून, तेथे अनेक अनुभव व दृष्टांत देऊन त्यांना अत्यंत उच्च आध्यात्मिक पदावर नेऊन सोडले. साईबाबांच्या निर्वाणानंतर एक महान आत्मज्ञानी सिद्ध योगी म्हणून त्यांची झालेली प्रसिद्धी व साकोरी येथील कन्याकुमारी स्थानाबद्दलच्या कार्याबद्दल वाचकांना माहीतच आहे.

साईबाबांनी देहत्याग केल्यानंतरही आपले हे कार्य चालूच ठेवले आहे. याचे अगदी ठळक उदाहरण गुजरातचे महान संत श्री मोटा यांचे आहे. त्यांना श्री बालयोगी, उपासनी महाराज आणि धुनीवाले दादा यांच्याकडून आध्यात्मिक मार्गदर्शन व अनुग्रह प्राप्त झाला होता. परंतु इ.स. १९३८ साली (म्हणजे स्वत:च्या देहत्यागानंतर २० वर्षांनी) साईबाबांनी (हल्ली पाकिस्तानात असलेल्या) कराची शहरी अनेक वेळा प्रगट होऊन श्री मोटांची अध्यात्मात आणखी प्रगती करून दिली आणि शेवटी २९ मार्च १९३९ रोजी रामनवमीच्या दिवशी श्री क्षेत्र काशी येथे अद्वैताचा साक्षात्कार देऊन त्यांना जीवनमुक्त अवस्थेत कायमचे नेले. श्री मोटा म्हणतात: 'He gave final touches to my spiritual progress.'

याशिवाय आधीच परमार्थाकडे लागलेल्या आणि शिरडीला आलेल्या आपल्या भक्तांची पारमार्थिक उन्नती करून त्यांना सद्गती दिल्याची साईबाबांची कितीतरी उदाहरणे देता येतील. म्हाळसापती, नानासाहेब निमोणकर, काकासाहेब दीक्षित, अण्णासाहेब दाभोलकर, बाळासाहेब देव, तात्यासाहेब नूलकर, बापूसाहेब जोग, बाबासाहेब तर्खड, अब्दुल्ला, बाळकराम मानकर वगैरे. ही सर्व मंडळी प्रपंचातील भरभराटी मागण्यासाठी किंवा एखादा रोग बरा होण्यासाठी आली. त्यांना आपल्या नरदेहाचे सार्थक करून घ्यावयाचे होते आणि बाबांनी ते मोठ्या आवडीने करून दिले.

एकूण साईबाबांची इच्छा होती की माणसाने जिवात जीव आहे तोवर परमार्थ साधून घ्यावा व जन्ममरणाच्या दु:खद फेऱ्यातून सुटका करून घ्यावी आणि म्हणून तर ते सदा सांगत असत:

वैभव कधीही नव्हे शाश्वत।
शरीर है तो सर्वदा अनित्य।
जाणूनि मृत्यु नित्य सन्निहित।
धर्म जागृत ठेवावा ॥३८॥

—अध्याय ३१

काम्यकर्मे द्रव्योपार्जन।
एतदर्थ न शरीरपोषण।
यावज्जीव तत्त्वज्ञानसंपादन।
हेंच जीवनसाफल्य ॥६३॥
जे श्रद्धावंत पुरुष योग्य।
संपादिती ज्ञान वैराग्य।
हें आत्मतत्त्वचि निजभोग्य।
भक्त सभाग्य ते जाणा ॥६६॥

—अध्याय ८

श्री साईबाबांच्या जीवनकथा

– चकोर आजगावकर

# अरे, तुझे ब्रह्म तुझ्या खिशातच आहे!

(स्थळ: मशिद वर्ष: १८९४)
बाबा, अब्दुल्ला व इतर.
शामा एका शेठजींना
घेऊन येत आहेत.

१८९२ ते १८९४ या काळात बाबांच्या महिमेचा प्रकाश आणि परिमळ महाराष्ट्रात पसरायला प्रारंभ झाला होता. दुःखी, रूग्ण, आर्त, निराधार माणसे बाबांच्या चरणाशी जशी येऊ लागली तशी जिज्ञासू साधक मंडळीही बाबांकडे महाराष्ट्राच्या जिल्हयांतून आकृष्ट होऊ लागली. बाबांनी लोकांचा संपर्क टाळण्यासाठी व लोकांना दूर ठेवण्यासाठी दक्षिणा मागायची प्रथा यानंतर एका दशकाअखेर १९०३ साली नियमितपणे सुरू केली. गृहस्थाश्रमातील प्रापंचिकांकडून त्यांच्या प्रार्थना ऐकण्यापूर्वी थोडा त्याग करवून घ्यावा, हा दक्षिणेमागील उदात्त हेतू होता. बाबांना दक्षिणेचे पैसे स्वतःसाठी नको होते. या प्रसंगाच्या वेळी ही दक्षिणेची प्रथा सुरू झाली नव्हती, पण बाबांना द्रव्यलोभी माणसांना धनाची आसक्ती व ब्रह्मज्ञान ह्या दोन वेगळ्या वाटा आहेत, हे दाखवायचे होते, एवढे येथे ध्यानात ठेवायचे आहे.

**बाबा :** अल्ला मालिक है! तो पहा, श्यामा कुणालातरी घेऊन मशिदीत येत आहे.

**शामा :** (एका शेठजींसमवेत प्रवेश करतात) नमस्कार बाबा! देवा, हे शेठजी फार लांबून आपल्या दर्शनासाठी आले आहेत.

**शेठजी :** (बाबांपुढे हार-फुले ठेवून नमस्कार करतात) होय बाबा! मी आपल्या दर्शनासाठी काही खास हेतू मनी धरून येथे आलो आहे. आपण मुक्त-पुरुष आहात, ही आपली कीर्ति कानी आली आहे. मला ब्रह्मज्ञानाची आकांक्षा आहे.

**शामा :** होय बाबा! या शेठजींना ब्रह्म पहाण्याची तहान लागली आहे. त्यांना ब्रह्म दाखवा!

**शेठजी :** बाबा, माझ्याकडे अपार संपत्ती आहे. घरी-दारी नोकर-चाकर राबत आहेत, पण मला ब्रह्मज्ञान तेवढेच नाही. आपण मला ब्रह्म दाखवाल काय?

**बाबा :** होय शेठजी! मला कळले. ब्रह्म ही वस्तू दुकानातून रोकडीने घ्यावी लागते. मीही एक मोक्षाचा दुकानदारच आहे, पण मी ब्रह्म उसनवारीवर किंवा उधारीने देत नसतो. हा एक रोकडीचाच व्यवहार आहे. मी घाऊक दराने ब्रह्माचा माल विकतो.

**शेठजी :** मग बाबा मला रोकडे ब्रह्म दाखवा!

**बाबा :** शेठजी, मला ब्रह्माची तहान असलेली माणसे फार आवडतात. बाकीचे फक्त संपत्ती, संतती, बढती मागत असतात. सारेजण सत्ता, धन, मान व वैभवासाठी झुरत असतात. केवळ ब्रह्मच मागणारा या जगात विरळाच! श्यामा, जा आणि नंदराम मारवाड्याकडून पाच रुपये मागून आण!

**शेठजी :** बाबा, मला लवकर ब्रह्माचे दर्शन घडवा!

**शामा :** देवा, नंदू मारवाडी बाहेरगावी गेला आहे.

**बाबा :** तर मग बाळा वाण्याकडून पाच रुपये आण! मला फार निकड आहे.

**शामा :** देवा, बाळा वाण्याच्या घराला टाळे लागलेले मी मघाशीच पाहून आलो आहे.

**शेठजी :** बाबा, मला उशीर होतो आहे. मला घरी परतायचे आहे. आता आणखी वेळ न काढता ब्रह्म दाखवा!

**बाबा :** शेठजी, माझा हा सारा खटाटोप तुला ब्रह्माचे दर्शन घडविण्यासाठीच आहे. तुला हे समजत नाही काय?

**शेठजी :** बाबा, तुम्ही पाच रुपये मागत आहात. यात ब्रह्माचा संबंध येतोच कोठे?

**बाबा :** श्यामा, या शेठजींना ब्रह्म कोठे आहे, ते समजलेले नाही. त्यांना त्यांचे ब्रह्म दाखव! त्यांचे ब्रह्म त्यांच्या खिशातील त्या गुंडाळ्यात आहे. ते त्यांना दाखव पाहू!

**शेठजी :** (आपले खिशे चाचपडतात) बाबा, ह्या नोटा आहेत. आपण तर संत आहात. संतांना धनाचे वावडे असते. आपण पुन्हा पुन्हा पाच रुपयांचा जप का बरे करीत आहात?

**बाबा :** (आवाज उंचावीत) हे लोभी माणसा, तुला संताबद्दल बोलताना काही लाजलज्जा वाटते आहे की नाही? तुझ्या खिशात शेकडो रुपयांच्या नोटा आहेत. तुझ्या तिजोरीत लक्षावधी रुपये भरलेले आहेत. हेच तुझे खरेखुरे ब्रह्म आहे. या जगात पैशाहून दुसरी कोणतीही गोष्ट तुला मोलाची वाटत नाही. मी एक क्षुल्लक रक्कम मागत होतो. असे असतानाही एवढ्या नोटा खिशात असूनही तू नुसता पहात बसला होतास. पाच रुपये हे ब्रह्माहून जास्त आहेत काय?

**शेठजी :** पण बाबा, मला घरी परतताना पैसे लागतील ना! काही तातडीचे खर्चही आयत्या वेळी भागवावे लागतात. यासाठी पैसे जपावे लागतात.

**बाबा :** पैसा हेच तुझे परब्रह्म आहे. तेच तुला आकस्मिक संकटातून तारील. तुला दुसऱ्या कोणत्याही ब्रह्माची आवश्यकता नाही. संसाराच्या पलीकडे नेणाऱ्या सत्याला तू सामोरे जाऊ शकणार नाहीस. परमेश्वराकडे नेणाऱ्या अंतिम प्रवासासाठी आवश्यक असलेले पाथेय तुला कधीही

लाभणार नाही. त्याला तू पात्र नाहीस.

**शामा :** बाबा, तुम्ही आमच्यापाशी केवळ नमस्कारच मागता. मग देवा, या शेठजीकडून तुम्ही पैसे का मागता? आमच्या फुकाच्या प्रणामावर तुम्ही संतुष्ट होता ना!

**बाबा :** मी काही प्रापंचिक भक्तांकडे दक्षिणा मागतो. स्वार्थाचा अल्पसा त्याग त्यांना शिकविण्यासाठी हा बहाणा असतो. संसारात बुडालेले लोक पैशाला प्रमाणाहून जास्त महत्त्व देतात. धनाच्या संचयासाठी सारी मनबुद्धी गहाण टाकतात. मान व कीर्ति याहूनही बहुतेकांना पैसा जास्त प्रिय असतो. ही स्वार्थाची सूक्ष्म देहावर बसलेली गाठ सैल करण्याची जरूरी आहे. दानधर्म वा दक्षिणा म्हणून त्याग केलेले अल्पसे धनही ही गाठ हळूहळू सैल करू शकते. तुझ्यासारख्या गुरुशरण आलेल्या भक्ताकडे मी फक्त प्रेम मागतो. त्यांच्याकडून मला श्रद्धा, सबुरी आणि शरणागती हवी असते. मन, बुद्धी, प्राण, अहंकार आणि देहभाव ह्या पाच रुपयांच्या त्यांच्या दक्षिणेवर मी प्रसन्न होतो.

**शामा :** बाबा, या शेठजींना ब्रह्माचा प्रकाश कधीच दिसणार नाही काय?

**बाबा :** (शेठजींना उद्देशून) हे मूर्तिमंत लोभाच्या पुतळ्या, तू येथून निघून जा! श्यामा, या शेठजीला आल्या पावलाने परत घेऊन जा! अशा चोरांसाठी पुन्हा मध्यस्थी करावयास येऊ नकोस. शाम्या, अरे लोभ आणि स्वार्थ मनातून पूर्णपणे नष्ट झाल्यावाचून ब्रह्म प्रगट होत नसते. अरे शेठजी, ज्यांची ब्रह्मसाक्षात्काराची पात्रता असते, तेच ब्रह्म पाहू शकतात. जे शुद्ध, सात्विक, निर्लोभ आणि पवित्र हृदयाचे असतात, ज्यांच्या भावना, बुद्धी, विचार, इच्छा आणि कृती पवित्र असतात, त्यांच्या हृदयात परमेश्वर स्वयमेव प्रगट होतो. (शेठजी मशिदीतून लगबगीने घरी परततात.)

**शामा :** देवा, तुझी करणी आणि वाणी अगम्य आहे. आम्हा अजाण मानवांना आपले मार्ग कसे कळणार? आम्ही आपल्या ज्ञानापुढे शरणागत आहोत.

**बाबा :** शाम्या, तुम्ही आपले शरीर, मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार माझ्या पायी समर्पण करा! तुम्ही माझ्याकडे पहा व शांत रहा! मी बाकी काय करायचे ते पाहीन. मी तुम्हाला हाती धरून संसार-सागराच्या पार नेईन.

**"साम्राज्य हेच माझे–**
**श्रद्धेत सार्वभौम**
**मी प्रेमचक्रवर्ती–**
**सामंत दिव्यधाम"**

**भक्ति उदंड प्रीति–**
**संसारी या ललाम**
**प्रेमार्त अंतरात–**
**घे नित्य जन्म राम**

**मी देहद्वारकेत–**
**व्यापून रोमरोम**
**हृत्कंपनी विराजे–**
**चैतन्यरूप श्याम**

–श्री साईगीतायन

(बाबांच्या या उपदेशाचा मतितार्थ असा की मनुष्य स्वार्थामुळे, आत्मकेंद्रितपणामुळे, धनदारालोभामुळे मन, बुद्धी, चित्त, देह, अहंकार ह्या पाच पातळींवर परमेश्वरापासून दुरावला आहे. पैसे देऊन दुकानातून आत्मज्ञान विकत मिळत नाही. त्यासाठी स्वत:ची आतून आचरण, विचार व साधना याद्वारे शुद्धी करायची असते. तेव्हाच आतला आत्मा आपल्या तेजाने तळपू लागतो. स्वार्थी व्यवहाराची विचार-आचाराची जळमटें प्रथम दूर सारायची असतात.)

## निरंकुश सत्ताधारी साई

काळ: १८९५) (स्थळ: मशिद व परिसर

(फाटके-तुटके नेसणारा, तरटावर झोपणारा, अनवाणी भिक्षा मागणारा हा लहरी फकीर ब्रह्मांड व्यापूनही मशिदीत एका जागी बसलेला असे. मशिदीतून तो साऱ्या स्थिर चराला पहात होता, स्पर्शत होता, आपल्या आज्ञेत वागवीत होता. सर्वसाक्षित्व, सर्वदर्शित्व, सर्वस्पर्शित्व आणि सर्वशक्तिमत्ता ही परमेश्वरी गुणवैशिष्ट्ये बाबा कधीकधी प्रगट करीत असत. एकदा शिरडीचा परिसर प्रचंड झंझावात व घनघोर वृष्टीच्या तडाख्यात सापडला होता. जलमय झालेली घरे-झोपड्या टाकून रहिवाशी मशिदीच्या आश्रयास आले होते.)

**एक भक्त :** काय हा पावसाळी वादळी दिवस! जणू महाप्रलयाची ही नांदीच वाटू लागली आहे.

**नानासाहेब डेंगळे :** **"तम काजळला आला दुर्दिन। वादळवारा गहन तुफान। ताडिल्लतेचे नभात नर्तन। द्यावा पृथ्वीवरी रुद्र जणु प्रलयतांडवा करी।।"**

आकाश काळवंडलेले आहे. तुफान वारा वहातो आहे. विजांचा चमचमाट चालू आहे. आकाश-पृथ्वीच्या अंगणात महारुद्राने जणू संहाराचे तांडवनृत्य मांडले आहे.

**दुसरा भक्त :** ही वीज नव्हे, तर जणू मृत्यूची कडकडणारी रेषाच आहे.

**नानासाहेब :** पृथ्वी जणू आसावरून ढळणार आहे, असे वाटते आहे.

**भक्तमंडळी :** श्री बाबा, दया करा! गुरे-वासरे, घरे-दारे, पशु-पक्षी सारे प्राणांतिक संकटात सापडले आहेत. आपले भक्त आर्तपणे प्रार्थित आहेत की साईप्रभू, हा आकांत आता आवरा!

**शामा :** देवा, आता या शिरडीला तूच तार! तुझ्यावाचून आमचा कुणी त्राता नाही.

**बाबा :** (हृदय हेलावून) श्यामा, नाना या इंद्रदेवाने आणि वरूणराजाने आता आपली मर्यादा ओलांडली आहे. आता त्यांना आवरलेच पाहिजे! (मशिदीच्या धारेवर उभे राहून आकाशाकडे पहातात व तारस्वरात ओरडतात) अरे थांब!

**नाना :** श्यामा, तो चमत्कार पहा! वादळवाऱ्याची उग्रता बाबांच्या आज्ञेपुढे चालणार नाही.

**"गिरा गजर मग उठे तारस्वर। डळमळले क्षण मशिद मंदिर। स्वये उठविती प्रभू पुकार। विश्वच कांपे**

उरी-उमटला निनाद वरूणाघरी॥''

**शामा :** नाना, बाबांची साद आकाशाला भिडली आहे. वरूणाने आज्ञा ऐकली आहे. वायुदेवसुद्धा झंझावाताचा नाद सोडून नम्र झाला आहे. पर्जन्य आवरला आहे. इंद्रदेवाने आपले लवलवणारे वज्र मागे घेतले आहे.

**बाबा** (जागेवर येऊन बसत) : अल्ला मालिक है! तुम्ही आता घरी परता!

**नाना :** केवढे आश्चर्य! जीवन स्तब्ध झाले आहे. आकाश मोकळे झाले आहे. वारा शांत झाला आहे. सृष्टी पुन्हा सजीव होऊन चैतन्याने नटणार आहे. बाबा, दयावंता! सहस्त्र प्रणाम! (प्रणाम करून भक्तमंडळी मशिदीतून बाहेर पडतात.)

शिरडीस श्री बाबांसमवेत वावरणाऱ्या भक्तमंडळींत प्रारंभी काशीराम, म्हाळसापती, गणपतराव कोते पाटील दांपत्य व त्यानंतर माधवराव (शामा) अशी भोळी-भाबडी व प्रेमळ माणसे ठळकपणे उठून दिसत. त्यानंतर डेंगळे बंधू, अब्दुल्ला व बऱ्याच उशिरा चांदोरकर, दासगणू यांच्यासारखे ज्ञानी भक्तही बाबांच्या परिवारात शोभून दिसू लागले. चांदोरकरांबरोबरच दासगणू त्यांचे अंगरक्षक पोलीस-शिपाई म्हणून १८९२ मध्ये दाखल झाले. दासगणूंचे खरे पदार्पण आणखी तीन वर्षांनी १८९५ मध्ये झाले, असे म्हणावे लागेल. कारण दासगणू (तथा गणपतराव सहस्त्रबुद्धे) यांचे १८९२ मधील आगमन हे चांदोरकरांच्या गाड्याबरोबर नळ्याची यात्रा असावी, असे यांत्रिक व श्रद्धाविहीन होते. दासगणू हे पोलीस-शिपायी होते. त्यांना नाटक-तमाशा-लावणी अशा शृंगारिक साहित्याची, लेखन आणि अभिनयाची आवड होती. त्यांच्या मनात भक्तीची, वैराग्याची भावना सुरुवातीस १८९२ ते १८९५ च्या काळात निर्माण झाली नव्हती. ही श्रद्धेची व प्रेमाची निर्मिती होण्यापूर्वी दासगणूंवर संस्कार व्हावे लागले. वामनशास्त्री इस्लामपूरकर या थोर भगवद्भक्ताशी शासकीय कामाच्या निमित्ताने गणूंचा परिचय झाला. त्याचे शिष्यत्व स्वीकारून गणू देवाकडे वळले. वामनशास्त्री यांनी आपल्या निर्वाणापूर्वी दासगणूंना पुढील आध्यात्मिक मार्गदर्शन श्री साईबाबांकडून घ्यावयाची आज्ञा केली. अशाप्रकारे गणू (योगायोगाने नानासाहेबांमुळे बाबांच्या परिवाराशी पूर्वी परिचित झाले असले तरी) पद्धतशीरपणे वामनशास्त्रींमुळेच श्री बाबांशी निगडित झाले. प्रथम साशंक चिकित्सेने बाबांच्या जवळ आलेले गणू नंतर पोलीस खात्यातील आपला करडा खाक्या सोडून शिरडीच्या प्रेमप्रवाहात बुडून गेले. वामनशास्त्रींनी डोळे उघडल्यानंतर गणूंना बाबांचे झालेले दर्शन हे मायाळू माऊलीचे, करूणामय मातेचे होते.

## तूं देवता दयेची

काळ : १८९५) (स्थळ : द्वारकामाई
बाबा, नाना,
शामा, अब्दुल
व इतर

**गणू :** (प्रवेश करून नमन करीत) बाबा, प्रणिपात!

**बाबा :** गणपतराव! श्रद्धेवाचून आणि प्रेमावाचून केलेला नाटकी प्रणाम देवाला नको बरे!

**गणू :** बाबा, मी प्रथम आपल्या पायाशी आलो, त्यावेळची व आजची माझी मन:स्थिती यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. तो माझा चिकित्सापूर्ण अहंकार आता वितळलेला आहे. आज मी शरण आलो आहे.

**बाबा :** गणपतराव, वामनशास्त्रींनी सांगितले, तरी तुम्ही स्वत:चा अनुभव स्वत: घ्यावयास हवा.

**गणू :** बाबा, माझ्या गुरूंनी माझ्या मनात साधना आणि संतांबद्दल श्रद्धा जागविली आहे. आपण एक फकीर नाही, तर प्रत्यक्ष नारायणस्वरूप आहोत, हे त्यांनी मला पटविले आहे. बाबा, मी तुमचा गणू आहे. मला गणपतराव म्हणू नका.

**बाबा :** गणू, तुझ्या गुरूंनी मी हरिरूप आहे, असे तुला सांगितले, तरी तू तुझी शिवभक्ती आणि हरिप्रेम टाकून फकिराच्या मागे लागू नकोस.

**गणू :** नाही बाबा, आपण केवळ माझे शिवहरि नसून साक्षात् प्रेमळ माता आहात. मला आपले दर्शन जगन्मातेच्या कृपाळू रूपात सदैव होत असते.

''तूं देवता दयेची-
तू प्रेम मूर्तिमंत
मायाळ माउली तू-
कारूण्य देहवंत
प्राणांतीचा सखा तू-
तू मायबाप बंधू
दे एक अमृताचा-
या चातकास बिंदू
मी बाळ कोटरीचे-
मायाळ पक्षिणी तू
बांधी मला तुझ्याशी-
हा दिव्य प्रेमतंतू''

-श्री साईगीतायन

बाबा, आपल्या पायाशी आलेल्या या अज्ञान बाळाला आता दूर लोटू नका.

**बाबा :** गणू, अरे तुला जवळ केले आहे ते कशाला? नाटक-तमाशातून बाहेर काढून तुला संतसेवक बनविण्याचा माझा इरादा आहे. सत्संगाने तू सुवर्णच नव्हे तर परीसच होशील.

**गणू :** ''माझी तृषा युगांची-
कल्पांती आवरेना
दृष्टीतूनी कृपेच्या-
तूं वर्षि प्रेमपान्हा

-श्री साईगीतायन

बाबा, ही जन्माजन्माची अखंड तहान घेऊन मी आपल्या चरणाशी पोहोचलो आहे. आता फक्त तुमचा प्रेमाचा पान्हा आणि कृपेचा अमृतस्पर्श मला हवा आहे. मी दीन-अनाथ, एकाकी आहे. मला माझे हित-अनहित समजत नाही. जगात पदोपदी ठेंचा लागून पाय रक्तबंबाळ झाले आहेत. अपमान, उपेक्षा, व्यथा आणि यातना यांनी

भरलेल्या संसाराचा सारा शीण घेऊन मी तुमच्यापाशी उभा आहे.

**बाबा:** अल्ला मालिक है! प्रभू तुझा सांभाळ करील बरे!

**गणू:** **''आहेस तू अमीर।**
**मी रंकसा भिकारी**
**आधार एक तुझा।**
**संसार अंध:कारी**
**तू स्वामी, मी पदाती।**
**तू नाथ, मी अनाथ**
**आकांती या जीवाला।**
**देशील काय साथ?''**

– श्री साईगीतायन

**बाबा:** गणू, मी शरणागती व प्रेम यांनी जखडला जातो. अनन्यभक्तीच तुला माझ्याशी व मला तुझ्याशी बांधून ठेवील. तुझे अश्रू मी स्वहस्ते पुशीन.

**गणू:** बाबा, आपणच माझ्या हृदयपंढरीत विराजणारे पांडुरंग आहात. माझ्या अंतरी अष्टसात्विकभाव जागृत झाले आहेत.कंठ भरून आला आहे. श्रद्धेच्या वीटेवर मी माझ्या पंढरीरायाला उभा करतो. त्याच्या पायाशी माझ्या भक्तीची चंद्रभागा वहात राहू दे! हे साईरूपी पांडुरंगा, तू माझ्या अंतरात जागा रहा!–

**''हृत्पंढरीत माझ्या–**
**तू जाग पांडुरंगा''**

दासगणू हे बाबांच्या भक्तवर्तुळात प्रथम १८९२ मध्ये आले. १८९५ मधील त्यांच्या पुनरागमनानंतर गणूदासांचे संशयी, शंकाकुल मन हळूहळू पालटले. त्यांचा बुद्धिवादी तसा करडा पोलिसी खाक्या खऱ्या प्रेमभावात व समतोल शास्त्रपूत भूमिकेत रूपांतरित झाला. त्यांची शृंगारिक तमासगीर व लावणीपर प्रतिभा शुद्ध व सखोल भक्तिभावात बुडाली. त्यांची शिवभक्तीची व वारकरी पांडुरंग प्रेमाची द्विविध निष्ठा हरि व हर यातील द्वैतावर आधारलेली होती. हरि आणि हराचे अद्वैत त्यांच्या हृदयावर अद्याप ठसलेले नव्हते. अशा वेळी बाबांनी एका चमत्काराद्वारे गणूंचे हृदयपरिवर्तन घडविले.

## वाहते चरणातून गंगा

(एका शिवरात्रीच्या दिवशी साईबाबांच्या भक्तमंडळात नव्या श्रद्धेने दाखल झालेले कवी दासगणू शिरडीस होते. त्यांना तेथून तीन मैलांवर असलेल्या गोदावरीच्या गंगाजलात तीर्थस्नान करण्याची इच्छा झाली. त्यांनी श्री बाबांकडे परवानगी मागितली. गणू हे वारकरी वैष्णव व शिवाचे भक्त होते. हे द्वैत दूर करण्यासाठी बाबांनी गणूंना गोदास्नानाची परवानगी नाकारली.)

वर्ष: १८९५) (स्थळ: द्वारकेत बाबा व संतकवी दासगणूंचा सुखसंवाद

**गणू:** बाबा, आज शिवरात्र आहे. गोदावरीच्या पवित्र गंगाजलात स्नानाची पर्वणी साधावी असे वाटते. गोदावरी जणू मला आपल्यापाशी यायची साद घालते आहे.

**बाबा:** अरे गणू, गोदास्नान कशास हवे? अरे, आपली सारी तीर्थे आणि नद्या ह्या मानवी शरीरातच वसल्या आहेत. या देहातच पवित्र त्रिवेणी संगम आहे.

**गणू:** बाबा, आपल्या ह्या शब्दांतले दिव्य अध्यात्म रहस्य मी जाणू शकत नाही. गुरू वामनशास्त्री यांचा शिवमंत्र माझ्या ओठी आहे म्हणूनच मला शिवाच्या पवित्र दिवशी गोदावरीच्या तिरी जाण्याची अनुज्ञा द्यावी.

**बाबा:** अरे, आज्ञाचक्रावरील पवित्र त्रिवेणीसंगमाचा गूढ अर्थ बाजूस राहू देत. आपण व्यावहारिक जगातला वास्तव अर्थ पाहू या! येथून तीन मैलावर असलेला गोदेचा प्रवाह या मशिदीतूनही वहातो आहे. मग एवढे लांब अंतर चालून जाण्यात काही स्वारस्य आहे का? तूच विचार कर!

**गणू:** बाबा, सांबजटेतून वहाणारी गंगा श्री विष्णूच्या पावलाजवळूनही वहाते. म्हणूनच शैव व वैष्णव ह्या दोन्ही नात्यांनी मला गोदेचे स्नान करू द्यात! ही माझी शिवउपासना ठरेल तशी वैष्णव भक्तीही होईल.

**बाबा:** ही पहा, गंगा माझ्या चरणापाशीही आहे!

**गणू:** (बाबांचे हे उद्गार दुर्लक्षून निरोपासाठी नमस्कार करतात) अरे, हे काय? बाबा, आपल्या अंगठ्यातून पाण्याच्या धारा उसळल्या आहेत!

**बाबा:** अरे गणू, हे पाय फार सनातन आहेत बरं! **''गंगे च यमुने चैव गोदावरी सरस्वती''**

**गणू:** (आश्चर्याने स्तिमित होऊन श्वास अवरोधून पहात राहत) बाबा, अगदी सत्य! या सनातन पुराण पावलांमधून विष्णूपदी गंगा वाहू लागली आहे. आपण प्रत्यक्ष महाविष्णू आहात. हा वारकरी आता या गंगाजलाने आपले माथे भिजवून घेणार आहे (पायावर मस्तक ठेवत).

**जाणिले मी तुज श्रीरंगा–**
**वाहते चरणातून गंगा**
**तूंच तो श्रीनारायणमुनी**
**तुझी ही गंगा पदवाहिनी**
**भगीरथी विमल जळामधूनी–**
**तीर्थता वरिते सत्संगा!**

बाबा, माझा कंठ दाटला आहे, माझे डोळे भरले आहेत. क्षणात वाटते आहे की तू हरि आहेस, हरही आहेस. कारण तुझ्या सांबजटांतूनही ही गंगा मला वाहताना दिसते आहे.

**बाबा:** अरे गणू, जो स्वत: ज्ञानमय, आनंदमय शिव आहे, तोच भक्तीसाठी हे देवभक्ताच्या विभक्ततेचे द्वैत एक लीला म्हणून खेळत असतो. अरे, तू बाह्यरूपाकडे न पहाता आतील हरिहराचे गुरूरूपऐक्य पहा! तेच मूळ विश्वात्मक गुरूतत्त्व कधी ब्रह्मा होऊन उपदेश करते, विष्णूरूपाने भक्तांना तारण्यासाठी संचारी बनते. पण मूळात ते सच्चिदानंदाचे आदिशिवरूप आहे. हेच सर्वेश्वर गुरूदेवांचे मूळ तत्त्व आहे.

**गणू:** होय बाबा, मी आता हरिहरात वेगळेपणा पहाणार नाही.

**प्रभो तू स्वत:च शिवयोगी**
**भक्तितून विभक्तता भोगी**
**फुलावा वैष्णव धर्म जगी–**

**द्वैतला उधळी भावरंगा!**

**प्रभो, तू गौरीहर श्रीधर**
**श्रीपती शंकर गंगाधर**
**योग तू भक्तिमय शुभकर–**
**विरक्ती रंगवी रसरंगा!**

(गणू भावाकूल होतात.)

श्री बाबा हे त्यांच्याकडे येणाऱ्या श्रद्धावंत भक्तसाधकासमोर अनेकविध दैवतांच्या रूपाने प्रगट होत असत. कारण ज्याची ज्या रूपावर श्रद्धा असे ते रूप दाखवून त्याची श्रद्धाभक्ती दृढतर करण्याची त्यांची पद्धती असे. पण त्यातले प्राणभूत सत्य हे की बाबा स्वत: त्या विश्वात्मक गुरूदेवाचा आविष्कार होते. ते स्वत: गुरूतत्त्व होते. श्री गुरूशक्तीचे ते चैतन्यशाली प्रतीक होते. बाबा स्वत: परमेश्वर असल्याची (अनल हक) भूमिका धारण करीत, पण ती फारच विरळा. त्यांची खरी भूमिका मी अल्लाचा, त्या फकीरगुरूंचा यादगार बंदा आहे (यादे हक), अशी विनयशाली असे. ते स्वत:ला श्री सद्गुरूंचे– त्यांच्या सरकारचे– एक विनम्र पाईक मानीत. हे सरकार म्हणजे तो फकीर अवधूत दिगंबर गुरू दत्तात्रेय होते. हे सरकार त्रिभुवनाचे अनभिषिक्त सम्राट होते. त्यांचे साम्राज्य मुक्तीच्या अपरंपार मुलुखावर होते. बाबांनी एकदा नाना चांदोरकरांना स्पष्ट बजाविले की माझ्या सरकारचे, गुरूदत्तांचे दर्शन चुकविणाऱ्याला मी कधीही पावणार नाही. कारण दत्ताहून अन्य थोर दैवत कोणते? बाबांना अशी खंत असे की त्यांच्यापाशी सारे क्षुल्लक गोष्टी, म्हणजे धन, संतान, मान, सत्ता मागतात, पण त्यांच्या सरकारची मोक्षरूप महासत्ता कुणी मागत नाही. हे मोक्षधन त्यांच्या शेतात वावरं भरून पडलेले असे.

## माधवा, अद्‌भुत हे सरकार!

वेळ: १८९७) (बाबा आपले भक्त शामा, नाना, गणू इत्यादींसह मशिदीत

**बाबा:** नाना, तू माझ्या सरकारचे दर्शन घेण्याचे का टाळलेस? श्री गुरूंचा तो गुरूवार होता आणि दत्तात्रेयांचे मंदिर वाटेवरच होते ना?

**नाना:** बाबा, दत्तमंदिराचे पुजारी घाटासाठी व जीर्णोद्धारासाठी नेहमी देणगी मागत असतात. यासाठी दत्तदर्शनास जावयाचे आज टाळले.

**बाबा:** नाना, दत्तासारखे दैवत नाही. कोपरगावच्या घाटावरील दत्तमंदिरातील माझ्या सरकारचे दर्शन चुकविण्याची दुर्बुद्धी तुझ्यासारख्याला व्हावी? अरे, भगवान् दत्तगुरूंचे दर्शन टाळणाऱ्यास मी कधीकाळी पावेन काय? अरे, देणगी द्यायचे मनात नसेल, तर देऊ नकोस, पण श्री गुरूंचे दर्शन कदापि टाळू नकोस.

**नाना:** बाबा, मी चुकलो. क्षमा करावी. मी पुन्हा अशी घोडचूक करणार नाही.

**बाबा:** नाना, आमच्यासारखे अल्ला के बंदे त्या महाप्रभूचीच शक्ती घेऊन काम करीत असतात. मानवतेच्या कल्याणासाठी आणि उद्धारासाठी, आम्ही त्या सच्चिदानंद सद्गुरूंच्या शक्तीचे प्रतिनिधी म्हणून वावरत असतो. तू तुझ्या साहेबाचा एक अधिकारी आहेस, तसे आम्ही त्या महासत्तेचे दूत आहोत.

**शामा:** देवा, तुम्ही आमचे देवाधिदेव आहात. पण तुम्हीच दत्तप्रभूंना एवढे सर्वेश्वराचे स्थान का देता?

**बाबा:** श्यामा, श्री गुरूच माझे फकीर सरकार आहेत. ते माझे स्वामी आहेत. माझे सरकार हे एक अद्‌भुत सामर्थ्य आहे. या सरकारचे साम्राज्य साऱ्या चराचरावर आहे. या अद्‌भुत लीलामय अवधूत शक्तीचा पारावार कुणालाही लागणार नाही.

**नाना:** बाबा, श्री गुरूंच्या तत्त्वामागील रहस्य सांगा!

**बाबा:** नाना, माझ्या सरकारची सत्ता काळावर आणि नियतीवरही चालते. तरीही प्रेम आणि शरणागतीने त्यास प्रसन्न करता येते. विश्वाच्या सूक्ष्म जडापासून विराटापर्यंत या सरकारचा अनिर्बंध संचार असतो.

**नाना:** बाबा, हे गुरूतत्त्व जर सूक्ष्म असेल, तर पिंडापासून ब्रह्मांडापर्यंत साऱ्या वस्तुजगताला ते कसा आधार देते?

**बाबा:** नाना, श्री गुरू हे वेदांताहून गहन गूढ असले, तरी ते कारूण्याचे अथांग सागर आहेत. ज्ञात आणि दृश्य जगाचे ते कारण आहेत. निरालंब निर्विकल्प असे हे तत्त्व विश्वाचा मायामय असा कुटुंब परिवार उभा करते.

**गणू:** बाबा, श्री गुरू हे एक गूढ व रहस्यमय शक्तितत्त्व असावे!

**बाबा:** माझ्या या फकिराची लीला अतर्क्य आहे. याच्या दिव्यत्वाला अंत नाही.

**या फकिराचा रिता न कोष**
**देवदयेचा हा अविनाश**
**अमरत्वाचे मुक्त वर्षितो**
**दान अखंड उदार!**

याला मोजता येत नाही, की मापता येत नाही. ही गुणातीत, अप्रमेय अशी दिव्य निरंजन अलक्ष ज्योती युगांचा अंधार प्रकाशमय करते.

**शामा:** बाबा, माझ्या देवा, या देवाधिदेवाकडे आम्ही मागावे तरी काय?

**बाबा:** **"दान माझिया सरकाराचे**
**कल्पांती नच सरावयाचे**
**लुटून घ्या हे दिव्य**
**हिरण्मय रत्नांचे भांडार"**

या अवधूताचे धन मागा! त्याचे पाय सोडू नका!

**नाना:** दत्तगुरूंचे धन म्हणजे मोक्षरूप संपत्ती असेच ना?

**बाबा:** होय, नाना! तो आनंद, ती मुक्ती मागा! माझ्या सरकारचं धन वावरं वावरं भरून पडले आहे. ते कुणी मागतच नाही.

**"शरणागत या वत्सल चरणी**
**पंचविषय तू न घे मागूनी"**

अरे, जन्म-मरणातून सुटण्यासाठी अवधूताचे अक्षय मोक्षधन मागा!

(सच्चिदानंद सद्गुरूंचा जयजयकार करीत सर्व घरी परततात.)

# ''अरे मुर्खा, तुझ्याकडे मौल्यवान वस्तू असताना तू इतरत्र का भटकतोस ?''

## रामचंद्र वामन मोडक (पेरूगेट, पुणे) यांचा प्रत्यक्ष अनुभव

साईबाबांच्या दर्शनास मी प्रथम १९०९ साली गेलो. त्यावेळी माझा त्यांच्यावर विश्वास बसल्याने पुढेही जात राहिलो. बाबा देहधारी असताना त्यांचे शेवटचे दर्शन मला १९१६ साली झाले. १९१२ सालची माझी शिरडीची यात्रा फार संस्मरणीय ठरली. मी तेव्हा नगरपालिका लोकल फंडाचा सरकारी ऑडिटर होतो. माझे मुख्य केंद्र मुंबईस होते, तर कुटुंब धुळ्यास. १९१२ मध्ये माझा एक वरिष्ठ अधिकारी मला फार सतावू लागला व त्या त्रासाने मी कधी नोकरी सोडतो याची वाट पाहू लागला. मी खात्याच्या परीक्षेस बसावे असे माझ्यावर दडपण येऊ लागले; कारण परीक्षेस बसलो की त्यात मला नापास करून नोकरीत अयोग्य ठरविण्याची चांगली संधी त्या वरिष्ठ अधिकाऱ्याला मिळणार होती. त्यापेक्षा परीक्षेलाच न बसता आहे त्या पगारावर (दरमहा १२० रु.) नोकरी चालू ठेवावी असे मला वाटू लागले. बाबा सर्वज्ञ व सर्वशक्तिमान असल्याने त्यांच्यावर सर्व भार टाकून काय होते ते पहावे असे मी ठरविले. त्याप्रमाणे मुंबईहून मी शिरडीस निघालो; पण निघताना कोणासही कळविले नाही. इतकेच काय, रजाही घेतली नव्हती. मी मनात आल्याबरोबर सरळ शिरडीस गेलो. तेथे बाबांच्या जवळ जाऊन बसलो की सर्व चिंता दूर होऊन मनाला एकप्रकारची शांती मिळते हे मी अनुभवले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजता कपडे करून निघण्याच्या तयारीने बाबांकडे जाऊन निघण्याची परवानगी मागितली. त्यावर बाबांनी,

''संध्याकाळी घरी जा !'' असे सांगितले.

संध्याकाळी गेल्यावर,

''सकाळी जा !'' म्हणाले.

याप्रमाणे ५ दिवस मला ठेवून घेतले. मी कशा परिस्थितीत शिरडीस गेलो होतो ते बाबांना पूर्ण ठाऊक होते. मी कोठे आहे, याचा घरच्या मंडळींनाही पत्ता नव्हता. माधवराव देशपांड्यांना माझी अडचण माहीत असल्याने त्यांनी माझ्या वतीने रदबदली करून बाबांना ते म्हणाले,

''हे पुष्कळ दिवस राहिले आहेत. आता त्यांना जाऊ द्या !''

बाबा लगेच रागाने म्हणाले,

''शाम्या, तो मला भेटायला आला आहे; तुला नव्हे !''

नंतर माझ्याकडे पाहून ते म्हणाले,

''तू माझ्याकडे आला आहेस की शाम्याकडे ?''

त्यांनी मला ऑफिसच्या कामात काही त्रास होणार नाही असे आश्वासन दिले. खरे म्हणजे परीक्षा मुंबईला चालू असताना त्यांनी मला शिरडीत डांबून ठेवले होते. त्यामुळे परीक्षेस बसण्याचा प्रश्नच उरला नव्हता. शिरडीच्या मुक्कामाच्या पाचव्या रात्री मला स्वप्न पडले. त्यात मी माझ्या धुळे येथील घरी आलेला असून माझी मुलगी मला,

''तुम्ही इतके दिवस कोठे गेला होतात ?'' असे विचारत आली, असे दिसले.

मी जागा झालो आणि मनाशी खूणगाठ बांधली की बाबा आज नक्की परवानगी देणार. असा मनाशी विचार करीत मी मशिदीच्या दारातून आत शिरून पाहातो तो बाबा अतिशय क्रोधावेशात शिव्यांचा वर्षाव करीत होते व हातात दगडही होता. दाराजवळ मी उभा असलेला त्यांनी पाहिले. दहा मिनिटातच ते शांत झाले व आपल्या गादीवर जाऊन बसले. मी लगेच जाऊन त्यांना साष्टांग नमस्कार केला. ते म्हणाले,

''उदी घे आणि निघ !''

त्यावर मी कोठे जावे याचा निर्णय लावण्यासाठी त्यांना विचारले,

''मी मुंबईला जाऊ का धुळ्याला जाऊ ?''

बाबा म्हणाले,

''धुळ्यास जा ! बाळासाहेब तुझी वाट पहात आहेत.''

स्वप्नातील मिळालेल्या सूचनेप्रमाणेच बाबांनी सांगितले याचा मला आनंद वाटून मी प्रथम धुळ्यास जाऊन मग मुंबईला गेलो. मुंबईला गेल्यावर वास्तविकरीत्या परवानगीशिवाय गैरहजर राहिल्यामुळे काही ठपका माझ्यावर आला असता तर आश्चर्य नव्हते; पण सर्वकाही सुरळीत चालले होते. हाताखालच्या कारकून मंडळींना, साहेब (मी) फिरतीवर कोठे गेले आहेत याची कल्पना नव्हती; तर माझ्या कुटुंबियांना, मी मुंबईतच आहे असे वाटले होते. शिरडीहून मुंबई किंवा धुळे यापैकी कोठेही जावयाचे असल्यास मनमाडवरूनच जावे लागते. त्या डिव्हीजनचे डेप्युटी कलेक्टर यांचा मुक्काम मनमाडला होता. त्यांनी मला पत्र पाठविले होते की मनमाडला उतरून त्यांना भेटून जावे. माझ्या मनात शिरडीहून निघताना मनमाडला उतरण्याचा विचार येताक्षणीच बाबा म्हणाले,

''अरे, तो विचार काढून टाक ! तो तिथे नाही. गडबड करू नकोस.''

याचा अर्थ लगेच माझ्या लक्षात आला नाही; पण मनमाडला उतरल्यावर कळले की एक तार आल्याने डेप्युटी कलेक्टर परगावी गेले होते; आणि बाबांचे बोल ब्रह्मलिखित ठरले. यावेळच्या पाच-सहा दिवसांच्या माझ्या शिरडीतील वास्तव्यात बाबा माझ्या अंतरंगात क्रांती घडवून आणीत होते. साईबाबाच माझे सर्वेसर्वा असून ऐहिक व पारमार्थिक प्रगतीसाठी मला दुसऱ्या कशाचीही जरूरी नव्हती अशी माझी पक्की खात्री पटली होती. हे सर्व पटूनही माझी वेदांवर व इतर धर्मग्रंथांवर जास्त भिस्त होती. शिवाय इतर भक्तमंडळींइतकी माझी निष्ठाही

बळकट झाली नव्हती. मी अजूनही बराचसा व्यवहारीच होतो.

१९१४ मध्ये एक असा प्रसंग घडला की ज्याने १९१२ साली बाबांनी मला दिलेल्या धड्यांना पुष्टीच मिळाली. माझ्या ओळखीच्या एका स्त्रीने मला धुळ्यास जाताना वाटेवर असलेल्या सोनगीरच्या गोविंदबुवांचे अवश्य दर्शन घ्यावे असे सांगितले होते; पण मी थेट धुळ्याला जाण्यास टांगा ठरविला. कर्मधर्मसंयोगाने म्हणा किंवा आणखी कशाने, सोनगीरला आमच्या गाडीच्या चाकाची लोखंडी धाव तुटली आणि धाव दुरुस्त होण्यास ३ तास लागतील असे कळले. माझ्याबरोबरचा स्वयंपाकी गोविंदबुवांचे दर्शन घेऊन आला व त्याने,

''साहेबांना (मला) दर्शनास घेऊन येऊ का?'' असे बुवांना विचारले. यावर गोविंदबुवांनी,

''स्नान करून दर्शनास यावे!'' असा निरोप धाडला.

बुवांच्या निरोपाबरहुकूम मी स्नान केले व बरोबर एक श्रीफळ व एक रुपया घेऊन दर्शनास गेलो. दर्शन घेतल्यावर बुवा म्हणाले,

''अरे मुर्खा, मौल्यवान वस्तू तुझ्याकडे असताना व त्या वस्तूचा तू अनुभवही घेतला असताना इकडे-तिकडे क्षुल्लक वस्तूसाठी का धावपळ करतो आहेस? असो! असे काही असले तरी तू स्वत:च्या घरी आला आहेस.''

अशारीतीने त्यांनी ते व बाबा एकच आहेत असे दर्शविले. त्यानंतर त्यांनी माझ्याकडे भिक्षा (भोजन) देण्याची इच्छा प्रगट केली. मी माझ्या स्वयंपाक्याकरवी भोजन तयार करविले. बुवा भोजनास बसले. त्यांना पाणी पिण्यासाठी एक लोटाभर पाणी ताटाशेजारी ठेवले होते. बुवांनी लोट्यात हात घालून एक पातळ पुरी काढली. ती खाऊन ते म्हणाले,

''इथे आम्हीही पुऱ्या तळतो.''

त्यावेळी माझ्या लक्षात आले, स्वयंपाक्याने केलेल्या पुऱ्या जाड होत्या. अशा सिद्धपुरुषाने बाबांची शिकवणूक किती मौल्यवान असते हे माझ्या मनावर बिंबविले. त्यानंतर बाबांच्या दर्शनाचा योग फार वेळा आला नाही. १९१६ साली मी माझ्या पत्नीस घेऊन गेलो होतो व दर्शन घेऊन त्याचदिवशी आम्ही परतलो.

समाधीनंतरही बाबांचे कार्य अदृश्यरीतीने चालू आहे. अवघडप्रसंगी ते कसे मार्गदर्शन करतात, मदत करतात याचा मला अनेक वेळा अनुभव आलेला आहे. १९१९ साली मी निवृत्त झालो. मला ८१ रु. पेन्शन म्हणून मिळू लागले. यानंतर लगेच एका मित्राच्या गिरणीत काम करू लागलो. यामुळे माझे मासिक उत्पन्न २५० रु. झाले. ही बाबांचीच कृपा! साधारणपणे माझी प्रकृती बेताचीच आहे. डोळ्यात मोतिबिंदू आहे. तरीपण बाबांच्या आधारे संसाराचा गाडा हाकीत आहे.

१९१६ साली नाशिकला ताप व खोकल्याने आजारी पडलो. वैद्यकीय खात्यातल्या माझ्या जुन्या मित्राने यावर क्लोरोहायड्रेट हे औषध घेण्यास सांगितले. यावर विश्वास न बसल्याने माझ्या पत्नीने सिव्हील सर्जन कर्नल बकले यांना आणले. त्यांनी ते औषध दिल्याबद्दल त्या मित्राची खूप हजेरी घेतली व मला डबलन्यूमोनिया झाल्याचे सांगितले. नंतर त्यांच्याच औषधोपचाराने मी बरा झालो. बाबांच्या प्रेरणेनेच माझ्या पत्नीने कर्नल बकले यांना वेळीच आणले व पाहिजे ते औषध लगेच बदलले गेले. नाहीतर कोण घोटाळा झाला असता!

मूळ लेखक – **कै. बी. व्ही. नरसिंहस्वामी**
मद्रास.

मराठी भाषांतर – **श्री. शं. बा. पटवर्धन**
मुंबई.

# निंदेला बाबाच परस्पर उत्तर देतात!

**त्या** दिवशी मी, सौ. व एक निस्सीम साईभक्त अवाक्‌च झालो! ज्या गोष्टीची आपण स्वप्नात कल्पनासुद्धा करणार नाही, अशा गोष्टी तथाकथित साईभक्त चांगल्या कार्याविषयी सांगतात, त्यासाठी मुद्दाम वेळ काढतात व आवर्जून श्रम, वेळ व पैसासुद्धा खर्च करून त्या कार्याला खीळ कशी घालता येईल, याची योजनाबद्ध कार्यवाही करतात, असा श्रींच्या भक्तीतील अतिशय कटू अनुभव आम्ही त्या दिवशी अनुभवला! हा एकच नाही, असे असंख्य कटू अनुभवांचे जहाल हलाहल प्रस्तुत लेखकाच्या वाट्याला आले व ते प्रथम कुरकुर करून व नंतर ते या मार्गातील एक महत्त्वाचा भाग समजून तो त्याला सामोरे जात आहे.

सर्व समाज आज महागाई, बेकारी, वाढत्या वयाच्या मुलामुलींची लग्नं न होण्याच्या समस्येला तोंड देत आहे. परंतु ह्या सर्व समस्यांना तोंड देत असताना त्यांना धैर्य मिळावे व त्यांची या मार्गात फसगत होऊ नये, यासाठी 'श्री साईसच्चरित' या अलौकिक ग्रंथराजावर श्रीकृपेने प्रवचनसेवा हा लेखक गेली पाच-सहा वर्षे करीत आहे. हेतू हाच की भक्तांनी केवळ अडी-अडचणींना तोंड देण्यासाठी सक्ती करू नये. त्या पलीकडे असलेली सद्‌गती व मोक्षप्राप्ती ही उद्दिष्टे त्यांनी समोर ठेवावीत व श्रींना सर्वभावे शरण जावे. परंतु विकृत मनोवृत्ती, सदोष दृष्टी व त्यागाचा अभाव असलेली, लौकिकासाठी मात्र अहोरात्र तळमळणारी भक्तमंडळी ही या मार्गात फार मोठी अडचण आहे, हे मला अनुभवांती पटले. मला जरी पटले तरी हीच अडचण माझ्या सहवासात येणाऱ्या अनेक साईभक्तांची आहे. त्यांना या समस्येला कसे तोंड देता येईल, याचे चिंतन मी गेली काही वर्षं करीत आहे. श्री साईबाबा केवळ समस्याच निर्माण करीत नाहीत, तर त्याचे उत्तरही त्याचबरोबर तयार ठेवतात, हे मला पटले व त्यामुळे अनेक भक्तांना या लेखाने थोडासा दिलासा मिळेल, म्हणूनच हे प्रयोजन!

वर उल्लेख केलेल्या घटनेनंतर मी अंतर्मुख होऊन विचार केला व निंदेच्या सातत्याने येणाऱ्या समस्येला श्रींनी कसे उत्तर दिले आहे, हे या घटनेद्वारे तपासले. एकदा श्री. दामूअण्णा रासने यांनी शिरडीला येणाऱ्या असंख्य भक्तांच्या गर्दीकडे पाहून श्रींना विचारले,

''आपण ह्या सर्वांना मदत करू शकता?''

त्यावर श्री म्हणाले,

(पृष्ठ क्र.५५ वर)

# तुमचं नशीब तुमच्या हातात

(मागील अंकावरून)

– पंडित ग. रा. सावंत

(रोगदर्शनाचा उर्वरित भाग)

आरोग्यरेषा मस्तकरेषेला मिळून स्थिरावत असेल व शुक्राच्या उंचवटयावरून एखादी बारीक रेषा निघून जीवनरेषा छेदून मंगळग्रहस्थानावर जात असेल तर व्यक्तीला दम्याचा विकार होतो.

आयुष्यरेषेवर यव असेल तर आनुवंशिक रोग होतो.

चंद्रग्रहस्थान बिघडल्यास सर्दी, पडसे व क्षय यासारखे आजार होतात. पित्तविकार व उष्णतेचे आजार होतात. तसेच बुधग्रहस्थान बिघडल्यास मस्तकाचे विकार व उन्माद होतो. रवि बिघडल्यास सांधेदुखी व डोळ्यांचे आजार होणे हे विकार होतात.

शनिग्रहस्थान बिघडल्यास पक्षघात होणे, पित्तापासून त्रास होणे ह्या गोष्टी संभवतात. शुक्रग्रहस्थान बिघडल्यास शुक्राच्या आजारापासून त्रास होतो. मस्तक, गळा हे आजार गुरूग्रहस्थान बिघडल्यामुळे होतात.

**कालदर्शन !**


पुढे होणाऱ्या आणि मागे होऊन गेलेल्या अनेक घटनांचे ज्ञान आपल्याला हातावरील रेषांवरून कळते. पण अमुक एक घटना निश्चितपणे कोणत्या दिवसवारी घडणार आहे, हे निश्चितपणे हस्तरेषेवरून सांगता येणार नाही. पण साधारणत: आपल्या तारतम्य ज्ञानाचा उपयोग करून त्या काळचा निश्चित अंदाज बांधता येतो. पण काही हात असे असतात की त्यावरून काळ निश्चित करताना थोडा फरक योजावा लागतो.


तर, या पद्धतीत सर्वप्रथम शुक्रग्रहावर मध्यबिंदू कल्पून त्यातून बुधग्रहस्थानावर जाणारी रेषा जेव्हा भाग्यरेषेला छेदील तेव्हा त्या व्यक्तीचे वय ३५ समजावे, मंगळग्रहस्थानाकडे जाणारी रेषा जेव्हा भाग्यरेषेला छेदील तेव्हा व्यक्तीचे वय २८ समजावे व तिसरी रेषा जेव्हा चंद्रग्रहस्थानावर जाताना भाग्यरेषेला छेद करील तेव्हा व्यक्तीचे वय २१ असे समजावे. पाश्चात्त्यांच्या मते मनुष्याच्या जीवनात दर ७ वर्षांनी काही विशिष्ट क्रांतिकारक बदल होत असतात. म्हणून सप्तवर्षीय पद्धतीप्रमाणे कालनिर्णय करणे श्रेष्ठ होय.

मनुष्याचे आयुष्य साधारणत: ९० ते १०० वर्षांचे असते. म्हणून एकूण रेषा ९० किंवा १०० वर्षांची मानावी व त्यावर ५, ५ वर्षांचे समान भाग पाडावेत. रेषा लहान असता तितकी वर्षे आयुष्य कमी समजावे. जीवनरेषा, मस्तकरेषा, अंत:करणरेषा व भाग्यरेषा ह्या चार प्रमुख रेषा होत. म्हणून ह्या चार रेषांवर यांच्या उगमस्थानापासून वयाचे आकडे टाकून घटनेच्या समयाचा निर्णय घेता येतो.

अंत:करणरेषा बहुतेक गुरूग्रहस्थानाकडून उगम पावून ती बुधग्रहस्थानाच्या टोकाशी हाताच्या कडेवर जाऊन स्थिरावते. म्हणून गुरूग्रहस्थानापासून ते बुधग्रहस्थानापर्यंतचा काळ १०० वर्षे कल्पून त्याचे ५ वर्षांचा एक याप्रमाणे २० भाग काढून हातावर प्रत्येक भागाच्या खुणेसाठी हातावरील रेषेवर बारीक रेषा ओढून खुणा कराव्या अथवा तेथे काळाचे आकडे मांडावे, म्हणजे अधिक स्पष्ट होईल. याचप्रमाणे भाग्यरेषा, मस्तकरेषा व जीवनरेषा यांच्यावरही अशाच खुणा कराव्यात. जेथे ज्या वर्षाची खूण येईल तेथे जर काही विशिष्ट चिन्हे किंवा रेषा या प्रमुख रेषेला येऊन मिळालेली असेल तर त्या चिन्हाचे जे फळ असेल त्याप्रमाणे ती घटना घडेल किंवा तेथे रेषा जर खंडित असेल तर तशाप्रकारचा धोका निर्माण होईल.

परंतु यातही सर्व रेषा सारख्या लांबीच्या नसतात. अशा वेळी विशिष्ट काळाचा अंदाज घेताना जीवनरेषेपूर्वीच बाकी तीन रेषा





स्वतंत्रपणे मोजून तारतम्याने सरासरी निर्णय घ्यावा लागतो. यावेळी जीवनरेषेवर दीर्घायुकारक चिन्हाचा गंडांतरयोग व संकटसूचक चिन्हे यांचा विचार करणे आवश्यक असते.

याशिवाय प्रत्येक वर्षाचे फल पाहण्याची पौर्वात्यपद्धती आहे. या पद्धतीत उजव्या हाताच्या बुधाच्या प्रथम पेरापासून वर्षगणना करण्यात येते. याप्रमाणे उजव्या हाताच्या पाच बोटांची १५ पेरे होतात. ती पहिली १५ वर्षे, त्यापुढील १५ वर्ष डाव्या हातावरून, पुन्हा ३० ते ४५ उजव्या हातावरून, ४६ ते ६० डाव्या हातावरून, ६१ ते ७५ उजव्या हातावरून, ७५ ते ९० डाव्या हातावरून, असा विचार केला जातो.

स्त्रीची पहिली वर्षे डाव्या हातावरून मोजावी व पुरुषाची उजव्या हातावरून मोजावी.

ज्या पेरावर निर्दोष उर्ध्वरेषा चक्र किंवा यव असेल त्या वर्षी लक्ष्मी प्राप्त होते. सर्वतऱ्हेची सुखे व यश प्राप्त होते. या पेरावर आडवी रेषा, नक्षत्र बिंदू किंवा एखादे दुश्चिन्ह असेल तर व्यक्तीला दुःख, भय, शोक इत्यादी गोष्टी प्राप्त होतात.

गुरुग्रहस्थानावरून १६ ते २२ वर्षे, शुक्रग्रहस्थानावरून २२ ते २७ वर्षे, मंगळग्रहस्थानावरून ३३ ते ३६ वर्षे, अशा कालावधीचा विचार केला जातो.

पौर्वात्य सामुद्रिकतज्ज्ञ डाव्या हातावरून पुढील मासफले मानतात. चैत्र मध्यमा, वैशाख तर्जनी, ज्येष्ठ अंगठा, आषाढ करतल, श्रावण उजवा करतल, भाद्रपद उजवा अंगठा, आश्विन उजव्या हाताची तर्जनी, कार्तिक उजव्या हाताची मध्यमा, मार्गशीर्ष अनामिका, पौष कनिष्ठिका (उजव्या हाताची), माघ डाव्या हाताचे बुधाचे बोट, फाल्गुन डाव्या हाताचे रवीचे बोट.

आयुष्यातील शुभाशुभ फलांचा विचार करताना जर हातावरील धनरेषा, जीवनरेषा आणि भाग्यरेषा ह्या तीनही रेषांनी शुभ फलाचा निर्णय दिल्यास तो काळ अतिशय शुभ असतो. कदाचित पेरावरून काढलेला निर्णय आणि रेषा मापून काढलेला निष्कर्ष भिन्न येण्याची शक्यता असते. अशा वेळी ते वर्ष मध्यम प्रतीचे असते.

(समाप्त)

(पृष्ठ क्र. ५३ वरून)

''आंब्याच्या झाडाला वसंत ऋतूत मोहोर येतो. त्याची सर्व फळं होत नाहीत. त्यातील बराचसा मोहोर जळून जातो. काही फळं कच्ची असताना पाखरं, टोळधाड, रोग यांत झडून जातात, फारच थोडी उरतात व त्यातील फारच कमी फळं परिपक्व होतात.''

थोडक्यात, श्रीमद्भगवद्गीतेतील सातव्या अध्यायातील ज्ञानी भक्तांची परिपक्व अवस्था ही पूर्णकृपेची असते. ती होईपर्यंत बरेच भक्त निंदेच्या टोळधाडीत सापडतात, रोगट मनोवृत्तीच्या भक्तांत त्यांच्या संगाने बिघडतात व श्रींची शाळा सोडतात. त्यामुळे सर्वदृष्टीने बाबा त्यांची निष्ठा व सबुरी जोखतात, हे त्यांना कळत नाही. ते जाण्याने उरलेल्यांचा फार मोठा फायदा होतो; कारण ते अशा असंगापासून व कुसंगापासून आपोआप वाचतात. प्रवचनसेवेत निकोपता यावी व सेवेत रमणाऱ्यांना अशा घटनांचे पडसाद उमटल्यानंतरसुद्धा विकल्प येतो की नाही, हे पाहता यावे म्हणून असे वारंवार घडते. प्रस्तुत लेखकाला एका सतत घडणाऱ्या घटनेचा सखोल अभ्यास करून एक सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय लेखासाठी मिळाला. साईभक्ती ही बिकट वाट आहे. त्यात काटेकुटे आहेत. त्यातून शुद्ध आचरणाच्या चिंचोळ्या वाटेने आपल्याला श्रीपर्यंत जायचे आहे. भक्ती करीत असताना प्रत्येक भक्ताला निंदेच्या अग्निदिव्यातून जावे लागते. त्यातून जो खरा असेल तोच टिकतो व उजळून निघतो. याही गोष्टीला तो श्रींची लीला समजतो व त्याचे श्रेय घेत नाही.


थोडक्यात, प्रत्येक भक्ताला आजच्या या कलियुगात निंदेला तोंड द्यावे लागते. निंदक हे कलीचे फार प्रभावी हस्तक आहेत. खरे भक्त श्रींच्या छायेत असतात. त्यांच्यावर निंदक कितीही प्रहार करोत, ते श्रींना सोडीत नाहीत. त्यामुळेच श्री त्यांचे संरक्षण करतात व त्याचबरोबर भक्तांना, निंदा व स्तुती समान लेखून, ज्ञानी अवस्थेत नेतात. तेव्हा भक्तांनी निंदकाची उलटी निंदा न करता त्यांची काळजी बाबा घेतील, हे लक्षात ठेवून आपले कार्य व भक्ती अखंडित ठेवावी. बाबाच परस्पर या समस्येला आपोआप उत्तर देतात, हे ओळखून त्यांच्यावर भार घालावा व निवांत रहावे.

**–श्री. अनिल रसाळ** वडाळा, मुंबई.

# ॥ यजुर्वेद ॥




— साईली




**य**जुर्वेद हा वेदसागरातील दुसरा वेद होय! ऋग्वेदाच्या खालोखाल याचा क्रम लागतो. ऋग्वेदाच्या मानाने हा खूपच लहान आहे. परंतु त्याच्या शाखा व उपशाखा यांचा विस्तार फार मोठा आहे. ऋग्वेदातील मंत्रांच्या विनियोगे, यज्ञाच्या माध्यमांतून देवत्वाची दीप्ति अनुभवण्यासाठी यजुर्वेदाची साथ लागते, असे श्रेष्ठ वचन आहे. यजुर्वेदाचे प्रामुख्याने दोन भेद आहेत: (१) शुक्ल यजुर्वेद व (२) कृष्ण यजुर्वेद.

व्यास महर्षींचे शिष्य वैशंपायन हे यजुर्वेदाचे प्रमुख उद्गाता होत. याज्ञवल्क्य ऋषींमुळे या वेदाचे दोन भाग झाले. ते वैशंपायनांच्या भगिनीचे पुत्र आणि वैशंपायनांचे श्रेष्ठ शिष्य होते. ते अत्यंत बुद्धीमान व करारी होते. वैशंपायन आणि याज्ञवल्क्य यांच्यामध्ये काही कारणाने दुरावा निर्माण झाला तेव्हा वैशंपायनांनी याज्ञवल्क्यांना आपली विद्या (वेदविद्या) परत करण्याची आज्ञा केली. त्यावेळी याज्ञवल्क्यांनी त्या विद्येचे वमन केले. परंतु वेदविद्येचा असा अपमान होता कामा नये म्हणून

वैशंपायनांच्या शिष्यांनी तित्तिर पक्ष्याचे रूप घेऊन ते याज्ञवल्क्यांचे वमन पुन्हा आपल्या चोचीत उचलून घेऊन उदरी साठविले. तेव्हा त्यानंतर याज्ञवल्क्यांनी सूर्याला गुरू केले व त्याच्याकडून ते विद्या शिकले. सूर्याने दिलेला वेद म्हणून त्याला शुक्ल असे नाव पडले. अध्ययनाच्या सोयीसाठी त्याच्या विविध शाखा झाल्या. त्यामध्ये मात्र मंत्रभेद, अनुक्रम, संख्या असा बराच फरक आहे. ह्या सर्वांमुळेच त्याचा विस्तार प्रचंड झाला आहे.

शुक्ल यजुर्वेदाच्या शाखा: (१) जाबाल (२) बौधेय (३) काण्व (४) माध्यंदिन (५) शापीय (६) तापायनीय (७) कापाल (८) पौंडवत्स (९) आर्वाटक (१०) परमार्वाटक (११) पाराशरीय (१२) वैधेय (१३) वैनेय (१४) औधेय (१५) गालव (१६) बैजव (१७) कात्यायनी

यापुढे जाबालाचे २६ आणि गालवाचे २४ भेद आहेत.

कृष्ण यजुर्वेदाच्या शाखा: (१) तैत्तरीय (२) चरक (३) मैत्रायणी ह्या ३ प्रमुख शाखा असून त्यांच्या आणखी शाखा खालीलप्रमाणे:

* तैत्तरीय – (१) आपस्तंब (२) बोधायनी (३) सत्याषाढ (४) हिरण्यकेशी (५) औधेय

* चरक – (१) चरक (२) आव्हरक (३) कठ (४) प्राच्यकठ (५) कपिंजल (६) चारायण (७) वारायण (८) वार्तान्वेय (९) श्वेताश्वर (१०) औपमन्यव (११) पातंडनीय (१२) मैत्रायणी

* मैत्रायणी – (१) मानव (२) दुदुभ (३) ऐकेय (४) वराह (५) हारिद्रव्येय (६) शाम (७) शामायनी

यातील सर्वच शाखा आज उपलब्ध आहेत असे नाही. भारताचा विचार करता असे दिसून येते की केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर उत्तर भारतातही शुक्ल यजुर्वेदाचाच प्रचार जास्त आहे. तसेच माळवा, नर्मदा परिसर, बिहार, बंगाल, हिमप्रदेश, मगध वगैरे प्रांतांतही तो विस्तृत प्रमाणात आहे. त्यामानाने कृष्ण यजुर्वेदाचा प्रचार फारच थोडा असून तो आंध्र, तुंगभद्रेचा किनारा, केरळ, गोदावरीच्या दक्षिणतिरी आणि अत्यंत तुरळक प्रमाणात गुजराथ, काश्मिर, सौराष्ट्र व गौडप्रदेश येथे आहे.

ह्या दोन यजुर्वेदांमध्ये कृष्ण यजुर्वेद प्राचीन आहे. त्याच्या तैत्तरीय शाखेतील हिरण्यकेशी शाखेच्या लोकांचे पठण अत्यंत स्वच्छ व कर्णमधुर असते. पण काही थोडेफार फरक सोडल्यास दोन्ही संहितांमध्ये फार मोठा दुरावा दिसून येत नाही. एकाच परमेश्वराच्या स्तोत्रांची गायिलेली ही संहिता आहे.

यजुर्वेदाचे एकूण ४० अध्याय असून सर्व अध्यायांत मिळून १९७५ ऋचा आहेत. त्यातील पहिले ३९ अध्याय विविध कर्मक्रियांचा विस्तार करतात तर ४० वा अध्याय म्हणजे स्वतंत्र ज्ञानकांड आहे. या अध्यायात प्रसिद्ध ईशावास्य नावाचे उपनिषद आलेले आहे. ह्या सर्व मंत्रांचा विचार करता त्यामध्ये खालील कर्मांच्या मंत्रमालिका आहेत:

(१) दर्शपौर्णिमा इष्टि (२) पितृयज्ञ (३) अग्निकर्म व सोमयज्ञ (४) वाजपेय व राजसूय यज्ञ (५) च्ययनकर्म (६) रुद्र (७) सौत्रामाणि (८) अश्वमेध (९) राजसूय (१०) पुरुषमेध (११) पुरुषसूक्त (१२) मेधामंत्र (१३) शिवसंकल्पोपनिषद् (१४) मरणोत्तरक्रियामंत्र (१५) शांतिपाठ (१६) महावीर मंत्र (१७) अवर्ग्य आणि ईशावास्योपनिषद् असे स्थूलमानाने विषय आहेत.

कृष्ण यजुर्वेदाची तैत्तरीय ही सर्वात मोठी शाखा असून त्या शाखेच्या यजुर्वेदाची ७ कांडे, ४४ प्रश्न, ६५१ अनुवाक्, १९, २९० पदे व २,५३,८६८ अक्षरे आहेत. या कांडामध्ये दर्शपूर्णमास, अग्निष्टोम, सुत्यदिन कर्तव्य, आराधना, यजमान, ब्राह्मण, राजसूय, पशुविधान, इष्टिविधान, अवशिष्टकर्म, न्यूनकर्म, पवनामनग्रह, वैकृतविधी, इष्टिहोम, इष्टिशेष, अग्निचिति, देवयजन, परिषेचन, वसोर्धारादि शिष्टसंस्कार, उख्याग्नि, चिति, इष्टकात्रय, वायव्यपश्वादि निरूपण, सोम इत्यादी ह्या सर्व विषयांबद्दलचे मंत्र गद्य व पद्य अशा स्वरूपात आहेत.

**यज्ञकर्म हा यजुर्वेदाचा विषय आहे.** एक यज्ञ म्हणजे अनेक कर्मांचा समुच्चय आहे. ह्या कर्मांमुळे विविध विद्यावंतांची संमेलने, चर्चा, प्रवचने, भाषणे, वाद-संवाद यांचा ज्ञानविलास आहे.

ह्या वेदांमध्ये असलेल्या १९७५ मंत्रांचा विचार करता असे लक्षात येते की त्यातील जवळजवळ ७९४ मंत्र हे ऋग्वेदातून यजुर्वेदात आलेले आहेत. अर्थात् काही मंत्र त्याच अर्थाने तर काही मंत्र अन्य अर्थाने आलेले आहेत. अशा काही विविधता असल्या तरीपण वेदांच्या मंत्रांचा प्रभाव आणि परिणाम मात्र एकच आहे. याच वेदांच्या ऋचा सामवेद तसेच अथर्ववेदातदेखील समाविष्ट झालेल्या आढळतात.

ऋग्वेदाच्या मानाने यजुर्वेदाचा शाखाविस्तार फारच मोठा असल्याने त्याचा अभ्यासही अतीव मोठा आहे. मानवी आयुष्याच्या सीमेत एखाद्या शाखेचे जरी अध्ययन करता आले तरी कृतार्थ होता येईल, असे तज्ज्ञांचे मत आहे.

### अध्याय १

या अध्यायात एकूण ३१ ऋचा आहेत. काही चांगल्या कृत्यांना उत्तम फळ मिळावे यासाठी ईश्वराची प्रार्थना करण्यात आलेली आहे. सवितृ देवतेच्या प्रार्थनेने या अध्यायाचा प्रारंभ झालेला आहे. या अध्यायात, यज्ञकर्माच्या वेळी करंगळीजवळच्या बोटात दर्भाचे जे **'पवित्रक'** घालतात त्याची स्तुती केलेली आहे. ते तयार करण्याचा सामान्य व सोपा विधी आहे. ज्याच्या हातामध्ये असे पवित्रक असते त्याला 'यजमान' म्हणतात. त्या पवित्रकाचे सविस्तर वर्णन यात दिलेले आहे. तसेच भगवंत जी वाणी धारण करतात, ती मनुष्यमात्रांचा विकास करणारी आहे म्हणून तिची स्तुती करून, भगवंतापाशी तिच्या व ऐश्वर्याच्या निरंतर रक्षणासाठी

प्रार्थना केलेली आहे.

यात अग्नीच्या समोर **व्रतधारी साधकाने** करावयाची एक प्रतिज्ञा व प्रार्थना आहे. विविध प्रकारच्या सुखांसाठी विविध प्रकारच्या क्रिया कराव्या लागतात. त्या करीत असताना अनेक नियमांचे काटेकोर पालन करावे लागते. या नियमपालन क्रियेला 'व्रत' असे म्हणतात. ही सर्व व्रते अग्नीच्या साक्षीने होतात. नित्यपूजेच्या वेळी भगवंताला धूप समर्पण करताना उपयोगात आणली जाणारी ऋचा यात समाविष्ट केलेली आहे. अग्नीची प्रार्थना करून, दुष्टांचा नाश करून त्यांनी (ऋत्वीजांनी) आपल्या सर्व क्रिया फलद्रुप करण्याची विनंती केलेली आहे.

**जलाची** स्तुती करून त्याला यज्ञ शुद्ध करण्याची विनंती केलेली आहे. कारण संसारी मनुष्याचे जीवन त्याच्या सहाय्यानेच सुसह्य होते. नित्यपूजेच्या प्रारंभी कलशपूजा करण्याचा प्रघात आहे. त्या पूजेनंतर त्या शुद्ध व पवित्र पाण्याने देवांना पाद्य, अर्ध्य, आचमन, स्नान, अभिषेक इत्यादी जलक्रिया पूर्ण केल्या जातात.

याशिवाय अग्नीची, मृगाजिनाची, धान्याची, घृताची (तुपाची), कुदळ, खुरपे, पृथ्वी आणि सर्वव्यापक विष्णूची स्तुती गावून यज्ञकर्म यशस्वी करण्यासाठी वेगवेगळ्या प्रार्थना केलेल्या आहेत.

## अध्याय २

या अध्यायातील ऋचांची संख्या एकूण ३४ आहे. यांत दर्भाची, तेजोमंडलयुक्त कुंपणाची राक्षस व शत्रू यांच्यापासून रक्षण करण्यासाठी, तसेच समिधांची आणि घृतपळीची यज्ञीय कार्ये पूर्णत्वास नेण्यासाठी स्तुती गाऊन प्रार्थना केलेली आहे. स्वतःच्या संरक्षणासाठी, यज्ञाच्या आणि यज्ञ करणाऱ्या यजमानांच्या रक्षणासाठी, तसेच असत्य कर्म, आचार आणि विचार यांपासून संरक्षण करण्यासाठी श्री विष्णूची प्रार्थना केलेली आहे.

यांत अग्निदेवता, इंद्र, सवितृदेव, अश्विनीकुमार, विश्वदेव इत्यादी देवतांची स्तुतीसुमने उधळून प्रार्थना केलेली आहे आणि जगाच्या कल्याणाकरिता उत्तमोत्तम इच्छा व्यक्त केलेल्या आहेत. विशेषत: यज्ञ निर्विघ्नपणे पार पडावा आणि आहुती स्वीकारून आम्हाला यशस्वी व फलसमृद्ध करावे, अशातऱ्हेच्या इच्छा व्यक्त करून मनोकामना पूर्ण होण्यासाठी प्रार्थना केलेल्या आहेत. सूर्यदेवाची प्रार्थना करून त्याने ब्रह्मतेजाचे दान आम्हाला अर्पण करावे, अशी मागणी केलेली आहे. या अध्यायात **पितरांची** एक प्रार्थना आहे. ज्या कुळात त्यांनी जन्म घेतला होता त्याच कुळात त्यांनी पुन्हा जन्म घ्यावा आणि कुळाचे रक्षण करावे, अशी इच्छा व्यक्त केलेली आहे. पितरांना कोणत्याप्रकारे तृप्त करता येते, याचाही विचार ऋचेत मांडलेला आहे.

## अध्याय ३

अग्नि हा अतिथीप्रमाणे पूज्य आहे. (अतिथी म्हणजे, ज्याची येण्याची व जाण्याची तिथी ठरलेली नसते व जो अल्पकाळच वास्तव्य करतो.) कठोपनिषदात अग्नीला अतिथी मानलेले आहे व त्याला तृप्त करण्याचा उपाय कथन केलेला आहे. अग्नि विद्वान अतिथीप्रमाणे घरात प्रवेश करतो. त्याला उदकादिकांनी शांत करावे लागते. त्याप्रमाणे अतिथीला जर अर्ध्य, पाद्य वगैरे देऊन शांत केले नाही तर तोदेखील असाच कठोर होतो. म्हणून तो अपमानीत होऊन जाणार नाही, याची काळजी घ्यावी; कारण अपमानीत होऊन निघून जाणारा अतिथी आपल्या पुण्यकर्मांची शिदोरी बरोबर घेऊन जातो. अशारीतीने या अध्यायात **अतिथी वैभव** वर्णन केलेले आहे. **पृथ्वी गतिमान आहे** हा सिद्धांत प्राचीन ऋषीमुनींनाही ज्ञात होता; कारण त्यासंबंधीची ऋचा ही चारही वेदांत आलेली आहे. तसेच सूर्य, इंद्र व उषा ह्या देवतांची स्तुती करून त्यांना हवि प्रदान केलेला आहे. या अध्यायात **मंगळ** या ग्रहाचा श्लोक आहे. या वैदिक श्लोकाचा मंगळाच्या अनिष्ट शांतीसाठी जप अगर हवन करतात.

यातील तीन ऋचा ब्राह्मणस्पतिसूत्राच्या आरंभी असून या ऋचा ऋग्वेदातही समाविष्ट आहेत. ३५ वी ऋचा म्हणजेच विश्वविख्यात **गायत्री मंत्र** आहे. त्या ऋचेच्या मागे प्रणव आणि व्याहृति यांचा समावेश केल्यावर तो संपूर्ण मंत्र बनतो. या मंत्राचा अर्थ असा की जो आजच्या बुद्धीला प्रेरणा देतो त्या सूर्यदेवाच्या सर्वोत्तम तेजाचे आम्ही ध्यान करतो. ६० व्या ऋचेत प्रख्यात **मृत्यूंजय मंत्राचा** समावेश आहे. **मृत्यूपासून अलगद सुटका** करण्याची मागणी यात केलेली आहे. देठापासून ज्याप्रमाणे काकडी आपोआप अलग होऊन पडते त्याप्रमाणे मृत्यूपासून आपोआप सुटका व्हावी आणि आम्ही या शरीराचा त्याग करताना अमृतत्वापासून अलग होऊ नये, अशी प्रार्थना केलेली आहे. याशिवाय अग्निदेवतेची स्तुती करणाऱ्या कित्येक ऋचा आणि अग्निदेवतेला केलेल्या प्रार्थना यात समाविष्ट आहेत.

## अध्याय ४

या अध्यायात पृथ्वीचा रस म्हणजेच जल, पवित्रतेचे पालन करणारी देवता, अन्न आणि रस यांनी परिपूर्ण असलेली अशी वनस्पती, ज्या अग्नीच्या उपासनेने ब्रह्माची प्राप्ती होते तो ब्रह्माग्नि नामक अग्नि, तसेच पृथ्वीमाता, सत्यस्वरूप वाणी, सोम सवितृदेवता, वायू, आदित्य, मित्र-वरुण इत्यादी सर्वांची स्तोत्रे गाऊन प्रदीर्घ आयुष्यासाठी, धनाचे रक्षण करण्यासाठी, याज्ञिकांना कर्मप्रवृत्त करण्यासाठी, यज्ञ करणाऱ्या यजमानास आनंदीत करण्यासाठी, वरुणाला यज्ञस्थानी बोलविण्यासाठी विविध प्रार्थना केलेल्या आहेत.

## अध्याय ५

पाचव्या अध्यायात आदित्य, वायू, यज्ञवेदी, पृथ्वी, अश्विनीकुमार, भगवान विष्णू, इंद्रदेवता यांची स्तुतीस्तोत्रे गायिलेली आहेत. तसेच अग्नीच्या विविध अवस्थांचे वर्णन असणारी ऋचा व **अग्नीची उत्कृष्ट प्रार्थना** असणारी ऋचा असून अग्निदेवतेला प्रसन्न करून घेण्यासाठी तिची विविध तऱ्हेने स्तुती केलेली आहे. तिच्या पराक्रमाचे वर्णन केलेले आहे. अग्नीच्या आश्रयाने सर्व शुद्ध होते. तसेच अग्नि हा सत्याचा स्वामी आहे

व सर्व वेदांचा, आमच्या कर्मांचा ज्ञाता आहे. अशातऱ्हेने अग्नीचा गौरव केलेला आहे.

### अध्याय ६

ऋषिवर्य राजाला आशीर्वाद देताना ज्या ऋचांचा उपयोग करतात त्यापैकी काही ऋचा यात आढळतात. **वाचाशुद्धीचा** मंत्र यात समाविष्ट केला गेलेला आहे. गुरूने शिष्याचे शुद्धीकरण करावयाचे असते. या मंत्रामध्ये शिष्याच्या कोणकोणत्या गोष्टींना पावित्र्य प्राप्त व्हावे लागते याचा उल्लेख आहे. वाचासमृद्धी प्राप्त झाली म्हणजे त्याला वाचाशुद्धी म्हणतात.

तसेच या अध्यायात **शिष्याला उद्देशून आशीर्वाद देण्याच्या निमित्ताने** म्हटली जाणारी ऋचा आहे. शिष्य गुरूगृही राहून विद्यावंत झाल्यावर स्वगृही जाताना गुरूंनी शिष्याला दिलेला हा आशीर्वाद अगर निरोप आहे. तसेच, जलदेवता, सोम, इंद्र, अश्विनीकुमार आणि विशेषत: अग्निदेवतेची स्तुती-स्तोत्रे समाविष्ट केलेली आहेत.

### अध्याय ७

वर्षाच्या बारा महिन्यांच्या काळात संसारी माणसाने सतत सुखी व समृद्ध असावे यासाठी विविध देवतांना यज्ञात आहुती देऊन संतुष्ट करून घ्यावे, यासाठी यज्ञ कोणत्या प्रकारचा करावा व कोणत्या फळाची अपेक्षा केव्हा करावी, याची कल्पना या अध्यायातील ऋचेत मांडलेली आहे. ऋग्वेदाच्या ५ व्या मंडलात आलेली ऋचा **रक्षोघ्नसूक्त** किंवा सूर्यसूक्त म्हणून प्रसिद्ध आहे. सूर्याच्या केवळ प्रकाशाने मानवी शरीरातील अनेक जखमा आपोआप बऱ्या होतात. ज्याला या गोष्टीचा लाभ घेता येत नाही त्याला या ऋचेच्या पठनाने लाभ घडतो. तसेच यातील ४२वी ऋचा ऋग्वेदातील सौरसूक्तात व ४३वी ऋचा ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलातील अग्निसूक्तात समाविष्ट आहे. याशिवाय इंद्रदेवता, अग्नि, विश्वदेव, वरूण, सोम, यज्ञपति, प्रजापती इत्यादी देवतांची स्तुती गावून प्रार्थना केलेल्या आहेत.

### अध्याय ८

या अध्यायातील ३२वी ऋचा विविध अनुष्ठानांमध्ये कलशस्थापना करण्यासाठी पठण केली जाते. तसेच पृथ्वीची प्रार्थना केलेली आहे. शिवाय इंद्र, वरूण, सोम, हवि इत्यादींची स्तुती केलेली आहे. सोमयागामध्ये एखादे विघ्न उत्पन्न होणार असेल तर त्या **विघ्नाची शांती** करण्यासाठी 'प्रजापतये स्वाहा' या मंत्राची आहुती दिली जाते व संकट दूर होते. यज्ञात दिलेल्या आहुतीच्या योगाने उत्तमोत्तम असे फळ मिळते. त्यासाठी, तसेच हा यज्ञ करणाऱ्या यजमानाला धन, पुत्रपौत्र आणि दीर्घायुष्य प्रदान करण्यासाठी प्रार्थना केलेली आहे. सुवर्णाप्रमाणे अमलिन व निरंतर शुद्ध, अश्वांप्रमाणे द्रुततर फल प्रदान करणारा, वीराप्रमाणे सर्वसंरक्षक, गोधनादी धन प्रदान करणारा अशी यज्ञाची स्तुती करून, ही घृताची आहुती यज्ञाने स्वीकारावी अशी इच्छा प्रगट केलेली आहे आणि हा यज्ञ आमचे अन्न आणि शरीर पवित्र करो, अशी प्रार्थना केलेली आहे.

### अध्याय ९

यात अश्वांनी वायुप्रमाणे अंत:स्फूर्तीने वेगवान व्हावे व युद्धामध्ये शत्रुसैन्याला पळवून लावावे व आम्हाला अन्न व धन याने समृद्ध करावे, तसेच बृहस्पतीने अन्नावर विजय प्राप्त करावा म्हणून त्यांना प्रार्थना केलेल्या आहेत. सांसारिक सुविधांच्या प्राप्तीसाठी केलेल्या यज्ञामध्ये विविध गोष्टींच्या लाभासाठी अनेक आहुती दिल्या जातात. ज्यांना आहुती दिल्या जातात त्या पुढीलप्रमाणे : प्राप्त केलेली विद्या, विद्येच्या विनियोगाने होणारे सुख, यज्ञ करण्याचे सामर्थ्य, जगताचे कारण, सर्व प्राण्यांची उत्पत्ती, स्थिती व लय यांना कारणीभूत होणारी शक्ती इत्यादी सर्वांना 'स्वाहा' या मंत्रांत पदाने आहुती दिल्या जातात. ह्या आहुती वरील कारणांसाठी स्वीकारल्या जाव्यात यासाठी प्रार्थना केलेली आहे. परमेश्वराची, प्रजापती, अग्नीची प्रार्थना यज्ञसंपन्नतेसाठी पुन्हा पुन्हा केलेली असून प्रत्येक देवतेने निरनिराळ्या **वस्तूंना** आपल्या मंत्रसामर्थ्याने या जगात आणले व त्यांना **नियंत्रित** केले, ह्या सर्व वस्तू साधकाच्या स्वाधीन व्हाव्यात म्हणून त्या देवतांजवळ प्रार्थना करण्यात आलेली आहे. यामध्ये एकूण चार ऋचांचा समावेश आहे.

### अध्याय १०

या अध्यायात जलदेवता, सोम, दर्भ, इंद्रदेवता, प्रजापती इंद्र, रथ, यज्ञ करणारा यजमान, प्रज्ञावंत, धर्मपालक, हविसेवक अग्नि, सर्वप्रेरक सूर्य, अश्विनीकुमार यांची स्तुती व प्रार्थना आहेत. तसेच "तू राष्ट्रनिर्माता आहेस. तुझ्या प्रसन्नतेसाठी तू आमची आहुती स्वीकार कर. यजमानाला राष्ट्र प्रदान कर व मलाही राष्ट्राची प्राप्ती करून दे" अशातऱ्हेची प्रार्थना यज्ञदेवतेला केलेली आहे.

### अध्याय ११

सवितृदेवाच्या प्रेरणेने मन एकाग्र करून स्वर्गप्राप्तीच्या कर्माचा आम्ही प्रारंभ करतो, असे यज्ञकर्म करणारे ऋत्विज म्हणतात व त्यासाठी यज्ञ करणाऱ्या यजमानाचे कल्याण करण्याची सवितृदेवतेस विनवणी करतात. अभ्रि (म्हणजे दोन्ही टोके अणकुचीदार असलेली कुदळ) मुळेच मृत्तिकेचे आवरण खणून यज्ञस्थळ निर्माण होते म्हणून तिची स्तुती केलेली आहे. तसेच अग्निचयनाच्या वेळी मृत्तिका गाढवाला दोरीने बद्ध केल्यास त्याचे कल्याण होईल, अशी इच्छा व्यक्त केलेली आहे. २६वी ऋचा म्हणजे अग्नीची एक उत्कृष्ट प्रार्थना आहे. ३८व्या ऋचेत **वृक्षारोपण मंत्र** समाविष्ट आहे. वृक्षारोपण करताना याच मंत्राचे पठण करतात व वृक्षांच्या मुळांवर आणि अग्रावरदेखील याच मंत्राने पाणी शिंपडतात. ५० ते ५२ ह्या ऋचांचा अगर मंत्रांचा उपयोग माणसाला पवित्र करण्यासाठी व अन्य वस्तूंमधील मलीनपणा नाहीसा करण्यासाठी करतात. **नित्य संध्याविधीमध्ये** मार्जनासाठी ह्या मंत्रांचा उपयोग करतात. यास **उदकप्रार्थना** म्हणतात. ८३वी ऋचा **भोजनमंत्र** होय! भोजनपात्र पूर्णपणे वाढून झाल्यावर भाताच्या मुदीवर जेवणाऱ्याने आपला हात

उपडा ठेवून भात तळहाताला स्पर्श करील असे पहावे आणि ही ऋचा म्हणावी.

याशिवाय यांत समृद्धी करणारा, विश्वपोषक, अग्रज, यज्ञनिर्वाहक, तेजसंपन्न, सुखद, स्वर्गतुल्य, आदरणीय अशी विविध प्रकारे अग्नीची स्तुती करून प्रार्थना केलेल्या आहेत. शिवाय वनस्पती, पाकस्थाळी (मातीची थाळी), अवट (जमिनीत खणलेला लहानसा खड्डा), उरवा (यज्ञासाठी तयार केलेली जागा) इत्यादींची स्तुती करून प्रार्थना केलेल्या आहेत. कारण ह्या सर्व गोष्टी यज्ञकर्मासाठी अत्यावश्यक आहेत.

### अध्याय १२

या अध्यायात विष्णूदेवता, अग्नि, वरूण, जलदेवता, मृत्तिका, इष्टिका (वीट), विविध धान्ये, विश्वदेव, औषधी, सोम, प्रजापती इत्यादी देवतांची स्तुती करून विविध प्रार्थना केलेल्या आहेत.

### अध्याय १३

या अध्यायात २०वी ऋचा म्हणजे भगवंताला दुर्वा अर्पण करताना किंवा कलशपूजेच्या वेळी **कलशात दुर्वा ठेवताना** म्हणावयाचा वैदिक मंत्र आहे. तसेच ३२वी ऋचा यज्ञ किंवा देवता-पूजनासाठी **पृथ्वीची पूजा** करताना म्हणावयाचा मंत्र आहे. विश्वोत्पत्तीचा क्रम आणि स्वामित्व निर्देश करणाऱ्या अशा अतिशय महत्त्वाच्या ऋचादेखील यात आहेत.

सूर्यनारायण, अग्निदेवता, दैदिप्यमान अशी इष्टिका, उरवा इत्यादी देवतांची स्तुती व प्रार्थना आहेत. २७ ते २९ ह्या तीन ऋचा पूजेच्या वेळी **देवाला मधाचे स्नान** घालताना म्हटल्या जातात. या अध्यायातील १४वा मंत्र हा **मंगळाचा वैदिक मंत्र** आहे.

### अध्याय १४

अध्याय १४ मधील बहुतांशी सर्व ऋचा ह्या **इष्टिका देवतेच्या** आहेत. इष्टिकेची अनेक तऱ्हेने यात स्तुती केलेली आहे. तिला चारही दिशांची सम्राज्ञी म्हटलेले आहे. तसेच इष्टिकेची हे इष्टिके, ''तूच मा, प्रमा, प्रतिमा, बृहती, विराट, गायत्री, अनुष्टुप, त्रिष्टुप, जगती, पृथ्वी, मन, कृषि, हिरण्य, गौ, अंतरिक्ष, नक्षत्र इत्यादी अनेक विशेषणे लावून स्तुती केलेली आहे.

### अध्याय १५

या अध्यायातील सर्व ऋचा म्हणजे इष्टिका देवतेला व अग्निदेवतेला उद्देशून केलेल्या प्रार्थना आहेत. चौदाव्या अध्यायाप्रमाणे याही अध्यायात इष्टिका देवतेची प्रचंड स्तुती केलेली आहे. तसेच पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, उर्ध्व अशा तेजोमय, शोभायमान अशा सर्व दिशा म्हणजे तूच, सोळा ऋचांच्या स्तवनाने होणारे बलरूपी धन आणि चव्वेचाळीस ऋचांच्या स्तवनांनी होणारे तेजधनही तूच, नांगरणी, वृष्टी, पेरणी ह्या अन्नद अवस्थाही तूच इत्यादी तऱ्हेने इष्टिकेची स्तुती करून 'तू यज्ञात विराजमान हो आणि आम्हाला प्रजावान कर, शरीराला वेढून राहणाऱ्या अन्नाने धन, शरीरात पसरणाऱ्या अन्नाच्या योगे शास्त्र, औषधी, शरीरपोषक अध्ययन व तेज यांना समृद्ध करून सर्व प्राण्यांना जय संपादन करून दे! शरीरात रसरूपाने पसरणाऱ्या अन्नाच्या रूपाने धर्माचा उत्कर्ष कर! अशातऱ्हेच्या प्रार्थना करून तिच्या वृद्धीसाठी अनेक प्रार्थनाही केलेल्या आहेत.

या अध्यायात अग्निदेवतेचीही नेहमीप्रमाणे सर्वांगाने स्तुती करून यज्ञाच्या कल्याणासाठी, वृद्धीसाठी, कीर्ति संपादनासाठी, भक्तांना अन्नसमृद्ध करण्यासाठी, शत्रूंचा पराजय करण्यासाठी, आपल्यावर अनुग्रह करण्यासाठी आणि आनंदघन फलप्राप्तीसाठी तिला केलेल्या प्रार्थना आहेत.

### अध्याय १६

या अध्यायात **रूद्राची** प्रार्थना आहे. जटाधारी व धनुष्यबाण धारण केलेला रुद्र (देव) पर्वतशिखरावर राहून प्राणीमात्रांचे कल्याण करतो. तो देवप्रमुख, अलौकिक ज्ञानसंपन्न वैद्य, नीलकण्ठ, अधिकारवाणीने बोलणारा असा रौद्ररूप धारण केलेला, सहस्त्रनेत्री आहे. त्याची विविध तऱ्हेने स्तुती करून शत्रुपासून रक्षणासाठी व मनोरथ पूर्ण करण्यासाठी, तसेच रौद्ररूप धारण करून आमच्या आप्तेष्टांची हिंसा करू नये यासाठी प्रार्थना केलेल्या आहेत. **१७व्या ऋचापासून** पुढील ऋचांमध्ये रूद्राला 'सेनानायक, दिशांचा अधिपती, वृषभारूढ, शत्रुसंहारक, अन्नपालक, जगत्पालक, पवित्र स्थळांचे रक्षण करणारा, वृक्षांचे पालन करणारा, सारथ्याचे रूप धारण करणारा, शत्रूंना रडायला लावणारा, धनोत्पादक असणारा, पायदळातील सैनिकांचा अधिपती असणारा, वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, बालकांच्या रूपाने वावरणारा, विविध रूपे धारण करणारा, मस्तकी जटा धारण करणारा, विश्वव्यापक, गतिमान, ज्ञानवान, पशुपालक, क्रोधाविष्ट, भक्तांना पापरहित करणारा, जगात प्रथम उत्पन्न होणारा अशातऱ्हेची अनेक विशेषणे लावून स्तुती करून वंदन केलेले आहे.

### अध्याय १७

या अध्यायात अग्नीची विविध प्रकारे स्तुती करून प्रार्थना केलेल्या आहेत. **यातील ९१वी ऋचा अग्नीचे स्वरूप** प्रगट करणारी आहे. त्याचप्रमाणे स्वरूप प्रगट करणाऱ्या या मंत्राने अग्नीची प्रार्थनाही केलेली आहे. हा अग्नी चार शृंगे, तीन पाय, दोन मस्तके, सात हात, त्रिबंधी वृषभाप्रमाणे गर्जना करणारा, दिव्यदेही आणि मृत्यूलोकाला व्यापणारा आहे. अशातऱ्हेने त्याचे स्वरूप प्रगट केलेले आहे.

### अध्याय १८

यज्ञाने संतुष्ट झालेले देव पृथ्वीवरील सर्व गोष्टी प्राप्त करून देवोत, अशातऱ्हेच्या प्रार्थना केलेल्या आहेत. २८व्या ऋचेत **प्रत्येक मासात कशाची समृद्धी** असावी, याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. उदाहरणार्थ: चैत्र-रुचिर आणि समृद्ध अन्न, वैशाख-जलक्रीडेची प्रेरणा, ज्येष्ठ-जलक्रीडेत रममाण होणे, आषाढ-यज्ञ इत्यादी. ४९वी ऋचा ही **वरुणाची** एक उत्तम प्रार्थना असून तिचा उपयोग अनेक कर्मकांडात केला जातो. इतर प्रार्थना ह्या यज्ञसमृद्धीसाठी नेहमीप्रमाणेच केलेल्या आहेत.